# निव्हाळा



## सुधीर कारखानीस

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# जिव्हाळा

(लघु कादंबरी)

-----------------

## --सुधीर कारखानीस--

# जिव्हाळा


## लेखक: सुधीर कारखानीस

ए 902 एकता मेडोज

सिद्धार्थ नगर, मागाठणे

बोरीवली ईस्ट, मुंबई 400066

मोबाइल 9223298186

ई मेल sudhirkarkhanis@yahoo.com


## मुखपृष्ठ- (संकल्पना) सुधीर कारखानीस


या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक:

ई साहित्य प्रतिष्ठान

ईलेवन्थ फ़्लोअर,

ईटर्निटी,

ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

प्रकाशन : 11 July 2024

©esahity Pratishthan®2024

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## लेखक परिचय :



# सुधीर कारखानीस

शिक्षण व अनुभव

शालेय शिक्षण एच डी हायस्कूल सोलापूर

एंजिनीरिंग ग्रॅजुएट पुना एंजिनीरिंग कॉलेज, पुणे, महाराष्ट्र

पावर सेक्टर मध्ये सुमारे 50 वर्षांचा उच्च पदस्थ अनुभव

टाटा पावर कंपनी, एल अँड टी, महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

लेखन

अनेक तंत्रज्ञानविषयक पेपर व दोन तंत्रज्ञानविषयक पुस्तके प्रकाशित

मराठी लघुकथा संग्रह "प्रतिबिंब", "तरंग", "गगन भरारी" "फुलोरा" व "पुष्पगंध" प्रकाशित

स्टोरी मिरर मध्ये नियमित ललित कथा लेखन

# अर्पणपत्रिका

माझे बंधु डॉक्टर अनिल कारखानीस, सौ नंदिनी व गौरी
यांना “जिव्हाळा”
ही लघु कादंबरी
सप्रेम अर्पण.

# लेखकाचे मनोगत

समाजातील प्रत्येक घटक एकमेकाशी कुठल्या न कुठल्या नात्यांनी बांधलेला असतो. या नात्या- गोत्याच्या बांधलेल्या रज्जुनीच कुटुंब घडते, परिवार घडतो, समाज घडतो.

नाती अनेक असतात. रक्ताची नाती, मित्रत्वाची नाती, बंधुत्वाची नाती, प्रेमाची नाती, पारिवारिक नाती, कौटुंबिक नाती, व्यावसायीक नाती, वगैरे. यातील उजवं नातं कोणतं आणि डावं कोणतं ते ठाम पणे सांगणे कठीण आहे. सर्वसामान्यपणे रक्ताचे नाते हे सर्वात पवित्र, अधिक कणखर, व दृढ नाते समजले जाते. पण अर्थात हा वैय्यक्तिक मताचा प्रश्न आहे. या समजाला कोणाताही ठोस पुरावा नसल्याने आणि विशेषत्वे, दीर्घ काळ टिकून राहण्याची कठीण परीक्षा पास होण्याची हमी नसल्याने, रक्ताच्या नात्याच्या श्रेष्ठत्वाबद्दल तज्ञ अभ्यासकातही एकमत नसल्याचे दिसते.

“जिव्हाळा”, या लघु कादंबरीमध्ये हीच विचारधारा कल्पित कथानका द्वारे वाचकांच्या समोर ठेवली आहे. सर्वसामान्य पणे, समाजात रक्ताच्या नात्याच्या श्रेष्टत्वाबद्दल मनात पूर्ण खात्री असल्यामुळे या लघु कादंबरी मधली पात्रे आणि त्याबरोबर वाचक वर्गही पूर्वअनुग्रहीत होतो. कथानक पुढे जात राहते. पात्रे नियतीने त्यांच्यासाठी आखून दिलेल्या मार्गाने चालतात. काहीही अनैसर्गिक वळणे येत नाहीत आणि नात्यांच्या श्रेष्ठत्वा विषयी अखेरीस कालच निर्णय देतो.

सुधीर कारखानीस

# प्रस्तावना

'रक्ताचे नाते म्हणजे श्रेष्ठतम नाते' असा सर्वसाधारण समज आहे. असेही बोलले जाते की, 'कुटुंब रक्ताच्या नात्यांनीच बनते'. रक्ताच्या नात्याच्या श्रेष्ठत्वाबद्दल बरेच वाद प्रतिवाद सतत चालूही असतात. दोन्ही बाजूने पुरावेही मांडले जातात. या वादांमधून कधी एकमताने निष्कर्ष निघाले तरी काळाच्या अवघड परिक्षेत ते तग धरतीलच याची हमी मात्र कोणीही देऊ शकत नाही.

'ब्लड इज थिकर दॅन वॉटर', हा माझ्या मते, एक गैरसमज आहे. खरं तर, जी माणसं नेहमीच आपल्या पाठीशी असतात, सर्व संकटात आपल्याला आधार देतात, आपल्याला कायम साथ देतात, तेच आपले खरे कुटुंबीय. आपल्या जीवनातल्या आनंदाच्या क्षणी म्हणा, किंवा जीवनातली अनेक आव्हाने झेलताना अनुभवलेल्या दु:खाच्या क्षणी आपले जवळचे साथीदारच आपल्याला सोबत करतात.

आपण प्रेमाने जगतो. आपल्याला इच्छा आहे म्हणून आपण प्रेम करतो, कोणाच्या धाकाने नाही. प्रेमाच्या बंधनांची शक्ती आणि प्रेमबंधनांच्या तऱ्हा वेगवेगळया असूहि शकतात पण खरे खुरे प्रेम बंधन मनाच्या आतल्या गाभ्यापर्यंत पोहोचलेले असते. उदाहरणार्थ, दत्तक मुलाला आई सांगते की तू माझ्या पोटातून नाही आलास पण माझ्या काळजातून नक्कीच आला आहेस. याचाच अर्थ असा की रक्त बंधनाने बांधलेली व्यक्ती तुमच्या हृदयाच्या जवळ असेलच असे नाही.

खरे कुटुंबीय फक्त हवेत गप्पा मारत नाहीत तर ते सातत्याने आणि निरलसपणे एकमेकाशी प्रेमाने आणि समजुतदारपणे वागतात.

या आणि अशा विवेचना मुळेच 'रक्ताचे नाते म्हणजे अति दृढ नाते' ही म्हण फोल व निरर्थक वाटते. खरे तर नात्यांचे रज्जू खऱ्या प्रेमातून आणि आदरभावनेतूनच दृढ होतात.

याच विषयाला लेखकाने या लघु कादंबरीच्या द्वारे येथे हाताळलं आहे. कोठेही प्रवचनात्मक आख्यान न झोडता मोठ्या कौशल्याने लेखकाने केवळ धावत्या कथानकाद्वारे नात्यागोतांबद्दल उहापोह केला आहे आणि वाचकाला सयुक्तिक निष्कर्षाप्रत आणून सोडलं आहे. असा अवघड विषय लीलया पेलण्याची लेखकाची शक्ती कौतुकास्पद वाटते.

गौरी कारखानीस
मनोविकार चिकित्सक, मुंबई

# जिव्हाळा

## प्रकरण १

उर्मिला भारतात आली. मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टी २ टर्मिनलवर तिचं आगमन झालं. मुंबई कस्टम्स च्या हिरव्या बत्तीच्या कमानीतून ती पुढे आली. सामानाची ट्रॉली उर्मिला ढकलत होती. ट्रॉलीमधे होत्या दोन बॅग्स आणि त्यावर बसलेला सौमील. गाडी ढकलत कस्टम्स फॅायरच्या पुढे आल्यावर टॅक्सी बुकिंगच्या बूथपाशी उर्मिला जरा रेंगाळली. 'समीरने नीट कळवलं असेल की नाही, कोणी घ्यायला आलं असेल की नाही' असा विचार उर्मिलेच्या मनात येऊन गेला खरा, पण आपल्या नवऱ्याच्या, समीरच्या, सर्व व्यवस्थित काम करायच्या सवयीवर तिचा पूर्ण विश्वास असल्याने तो विचार उर्मिलेने ताबडतोब मनातून झटकून टाकला. 'आगमन' च्या बी एक्झिटच्या दिशेने उर्मिलाने बॅग ट्रॉलीसह आपला मोर्चा वळवला.

बी एक्झिटच्या बाहेर रेलिंगला रेंगसून मोठी देशमूख गॅंग उर्मिलाच्या स्वागताला उभी होती. समीरदादाशी इंगलंडमधे रजिस्टर लग्न केलेली वहिनी कशी आहे हे पहाण्याच्या कुतूहलाने नव्हे, तर समीरदादावर असलेल्या प्रेमास्तव रात्री दोन वाजता फुल पलटन आली होती. समीरने पाठवलेल्या फोटोंवरून सर्वांनीच ट्रॉली ढकलत बाहेर येणाऱ्या उर्मिलेला अचुक ओळखलं होतं. हसतमुख, पण प्रवासाने श्रांत झालेला चेहरा, प्रवासी पेहराव, बॅगांनी भरलेली ट्रॉली, सर्व काही सारासार विचारशृंखलेत चपखल बसणारं होतं. पण नजर अडकत होती ती, त्या बॅगांच्या

ढिगावर बसलेल्या, आजुबाजुच्या जगाकडे विस्फारित नजरेने पहाणाऱ्या त्या दोन-अडीच वर्षांच्या बटु मूर्तीवर. कोण हा मुलगा? कोणा सहप्रवाश्याचा किंवा हिच्या कोणा मैत्रिणीचा मुलगा आहे की काय? सर्वांच्याच मनात अनेक तर्क वितर्क चालले होते.

उर्मिला बाहेर आली. रेलिंगच्या मागे उभ्या असलेल्या, रात्रीच्या त्या अवेळी आपल्या प्रिय जनांची आतुरतेने वाट पहाणाऱ्या त्या एकूण जनसमुदायावर तिने नजर टाकली. समीरने दाखवलेल्या फोटोतील चेहऱ्यांना मेमरी रिकॅाल केलं गेलं, आणि मग गिरिश काका, रोहन, मनीष सगळे ओळखले गेले.

उर्मीला ट्रॅाली ढकलत देशमुख ग्रुपसमोर येऊन उभी राहिली.

“हाय एव्हरी वन, आय आम उर्मिला,” हसत हसत उर्मिला म्हणाली. “आणि हा सौमिल, माय सन फ्रॅाम प्रिव्हियस मॅरेज”.

देशमुख ग्रुपमधे एकदम हिमनगाशी टक्कर झाल्यासारखी शांतता पसरली.

उर्मिला घटस्फोटिता आहे हे सर्वांना माहिती होतं. ते हलाहल सर्वानी पचवलंही होतं. पण ती सापत्य घटस्फोटिता आहे हे कधीच समीरने सांगितलं नव्हतं.

गिरिश काका सर्वात आधी सावरला. “चला रे, ट्रॅाली घेउन चला लिफ्ट कडे. गाडी वरच्या एलेव्हेशनला आहे.” गिरिश काका म्हणाला.

सगळे भानावर आले. रोहनने ट्रॅालीचा ताबा घेतला. उर्मिलाने छोट्या सौमीलला कडेवर घेतलं. सगळे लिफ्टकडे चालू लागले. स्वच्छंद आनंदाच्या, मजेच्या वातावरणावर काहीसं विरजण पडल्यासारखं झालं होतं. मंडळी नाकासमोर बघत झपझप पावले उचलू लागली.

सामान गाडीत चढवलं गेलं. पार्किंग चार्ज चुकता करून गाडी घरच्या रस्त्याला लागली. रात्रीचे अडीच वाजले होते तरीपण हायवेवर तुरळक वाहतुक होतीच.

सगळेच शांतपणे बसले होते. आपापल्या विचारात गढले होते. सौमील उर्मिलाच्या मांडीवर झोपला होता.

गिरिश काकाने आठवण करून दिली. ‘‘अरे समीरला फोन लावा कुणी. वाट पहात असेल तो. स्वीडनला त्याच्याकडे नऊच वाजलेत’’.

ताबडतोब समीरला फोन लावण्यात आला.  स्पीकर ऑन केला गेला, सगळ्यांना बोलता यावं म्हणून.

‘‘हॅलो समीर, मंडळी पोहोचली सुखरूप’’,  रोहन म्हणाला. ‘‘आता घरी चाललोय’’.

‘‘सामान वगैरे आलं नं सगळं ठीक ठाक? आणि सौमिल कसा आहे? प्रवास झेपला नं त्याला व्यवस्थित?’’ समीरने विचारलं. सौमिल बद्दल विचारताना समीरच्या आवाजातली काळजी उघड जाणवत होती.

‘‘सामान आलं सगळं व्यवस्थित.’’ उर्मिलाने उत्तर दिलं. ‘‘सौमिल मजेत होता फ्लाइटमधे. सगळंच नवीन नं त्याला! आता झोपलाय .’’

कारमधून पाच सहा माणसं मिळून जाताना, याहून जास्त संभाषण शक्य नव्हतं आणि खरं तर जागरणाने सगळेच पेंगुळलेले होते. त्यामुळे फोन कॅाल आवरता घेतला गेला.

गाडीत परत सर्वांनी आपापल्या अंतर्विश्वाचं कवाड बंद करून घेतलं.

तिकडे स्वीडनमधे समीरने आपली नजर परत कॅाम्प्युटरकडे वळवली. टॅक्स फाइलिंगचे दिवस होते आणि समीरकडे दोन तीन मोठे कॅार्पोरेट अकाउंट होते. या दोन अकाउंट्स मुळेच समीरला उर्मिला बरोबर भारतात जाता आलं नव्हतं आणि स्वत:चं तिकिट एका आठवड्याने पुढे ढकलावं लागलं होतं.

***************

समीरची आणि उर्मिलाची ओळख  दीड वर्षांपूर्वी लंडनला  झाली होती.

मुंबईला चार्टर्ड अकाउंटंटची परीक्षा चांगल्या तऱ्हेने पास झाल्यानंतर समीर इंटरनॅशनल लॅा व अकाउंट्स मधे प्रविण्य मिळवण्यासाठी इंग्लंडला आला होता. परिक्षेत उत्तम यश मिळाल्यानंतर त्याला तिथेच एका प्रसिध्द चार्टर्ड अकाउंटिंग फर्म मध्ये जॅाबही मिळाला.

इंगलंडमधे आल्यावर पहिलं काम म्हणजे बूड टेकायला जागा शोधणे. सुरुवातीचे थोडे दिवस हॅाटेलमधे काढल्यानंतर, लॅा स्कूलमधल्या मित्राच्या शिफारसीने, समीर चेम्बरलेन स्ट्रीटवरच्या मिसेस नाईक यांच्या घरापर्यंत पोहोचला. मिसेस नाईक लंडन मधल्या सिटी हॅास्पिटलमधे मेडिकल ॲडमिनिस्ट्रेटर म्हणून काम करायच्या. चेम्बरलेन स्ट्रीटवरच्या त्यांच्या मोठ्या घरात आता त्यांच्याशिवाय इतर कोणीही नसल्याने काही वर्षांपासून वरच्या दोन खोल्यांमधे त्यांनी पेइंग गेस्ट ठेवायला सुरुवात केली होती. सुरक्षिततेच्या दृष्टीने पेइंग गेस्ट भारतीय असलेले बरे हा त्यांचा दृष्टीकोन तर होताच. त्याचबरोबर  शिक्षण, कौटुंबिक पार्श्वभूमी वगैरेंच्या त्यांच्या पडताळणीतून, अगदी ओळखीच्या शिफारसीतून आलेल्या  पेइंग गेस्ट अर्जदारांनाही जावे लागे.  कित्येक वर्षांपासून लंडनमधे राहिल्यामुळे आणि दर्जेदार हॅास्पिटलमधे बरीच वर्षे काम केल्याने स्वच्छता, टापटीप, नियमितपणा याबद्दल

त्यांनी गुणवत्तेची सीमा बरीच उंच ठेवली होती आणि ही सीमा गाठू न शकणाऱ्या पेइंग गेस्टना डच्चू द्यायला त्या मागेपुढे पहात नसत.

सुरुवाती पासूनच मिसेस लीलाताई नाईकांबरोबर समीरचं चांगलं समीकरण जमलं.

उच्चभ्रू मराठी कुटुंबाच्या चांगल्या सवयी समीरच्या अंगात पूर्णपणे भिनल्या होत्या. त्यामुळे लीलाताई नाईकांच्या सर्वच परीक्षांमधे त्याला पैकीच्या पैकी मार्क मिळायचे. आणि समीरच्या दृष्टीने काय, एकटा जीव सदाशीव असल्याने, कुठेतरी भिरभिरत फिरण्यापेक्षा लीलाताईंचं सभ्य, शांत वस्तीतलं घर समीरला जास्त श्रेयस्कर वाटलं होतं.

लीलाताईंकडे परिचितांची बरीच वर्दळ असे. खालच्या लिव्हींग रूम मधे आल्या गेल्याची उठबस, त्यांचे चहापाणी वगैरे चालत असे. समीरचा त्याच्याशी काही संबंध यायचा नाही. कॅारिडॅारमधून त्याला ये जा करायला स्वतंत्र जिना होता, बाथरूम वगैरे तर वरच्या वरच. सगळंच स्वतंत्र.

आज लीलाताईंकडे त्यांच्या हॅास्पिटलच्या ऑपरेशन थिएटरची सिस्टर उर्मिला आली होती. उर्मिला राजवाडे.  तिच्या हुशारीमुळे आणि प्रसंगावधानी वागण्यामुळे हॅास्पिटलमधल्या सगळ्याच सर्जनस् ना उर्मिला थिएटर मधे ड्यूटीवर असताना निर्धास्त वाटत असे. सर्जन, असिस्टंट डॅाक्टर जरी उर्मिलाला टीम मेट म्हणून बरोबरीचा मान देत असले तरी उर्मिला आपली पायरी ओलांडत नसे. सर्वांशीच तिने आदबशीर वागणूक ठेवली होती.

यूरो सर्जन मराठेंची आणि जनरल सर्जन ठाकरेंची गोष्ट मात्र वेगळी होती. उर्मिलाचे डॅाक्टर मराठेंशी आणि डॅाक्टर ठाकरेंशी असलेले जरा जास्तच

खेळीमेळीचे संबंध, जवळीक सर्वांच्याच लक्षात आली होती, पण पाश्चिमात्य संस्कृतीचा चष्मा लावलेल्या लोकांना यात फारसं वावगं वाटत नव्हतं.

लीलाताईंशी गप्पा मारताना, समीरची वर चाललेली फाईल्सची शोधाशोध, खुर्ची ओढल्याचे आवाज, अस्पष्टपणे खाली ऐकू येत होते.

"वर कोणी आहे वाटतं?" उर्मिलाने विचारलं.

"अरे हं, समीर आहे वर, माझा पेईंग गेस्ट. थांब तुझी ओळख करून देते." लीलाताई म्हणाल्या.

लीलाताई उठल्या. कॅारिडॅारमधल्या जिन्याच्या तोंडाशी जाऊन त्यांनी आवाज दिला. "समीर, जरा खाली येणार का? आहे का वेळ?"

"हो, हो, येतो मी दोन मिनिटात". समीरने वरुनच उत्तर दिले.

"मुंबईकर दिसतोय", उर्मिला पुटपुटली.

समीर खाली आला. लीलाताईंनी ओळख करून दिली.

सुरुवातीला समीरला उर्मिलाशी बोलायला कुठलाही सामाइक प्रांत सापडेना. दहाएक मिनिटातच समीर वर परत जाण्यासाठी उठला. लीलाताईंच्या आणि उर्मिलाच्या लक्षात आलं की समीरला आपल्या संभाषणात त्याची जागा सापडत नाही. लीलाताईंनी संभाषणाची दिशा वळवली. लंडनमधे पुढच्या आठवड्यापासून चालू होणाऱ्या महाराष्ट्र महोत्सवाबद्दल बोलायला सुरुवात केली. मग मात्र समीरला आपली जागा सापडली आणि पुढचा अर्धा तास गप्पांमधे कसा गेला ते कळलं नाही.

समीरला मग लाइन अप केलेल्या कामांची आठवण झाली आणि तो उठला आणि "भेटू या मग कार्यक्रमाला", असे बोलून त्याने निरोप घेतला.

दिवस जात राहिले. महाराष्ट्र महोत्सवामध्ये उर्मिला आणि समीर दोन तीनदा भेटले. महोत्सव संपल्यानंतर लीलाताईंच्या लिव्हिंग रूम मधे महोत्सवावर चर्चा खूपच रंगली.

मग एका वीक एन्डला लीलाताईंबरोबर समीर आणि उर्मिला पिकनिक आणि बोटिंग क्रूझला गेले.

महिन्या दोन महिन्यांनंतर समीरला उर्मिलाशी गप्पा मारायला लीलाताईंची मध्यस्ती लागेनाशी झाली.

दोघांचीही कार्यक्षेत्रं वेगळी. दोघंही आपापल्या क्षेत्रात गळ्यापर्यंत बुडालेले कर्मयोगी.

समीरची भावंडं, कझिन्स, वहिन्या, मेव्हणे, काही मोजके वडीलधारे असा मोठा परिवार मुंबईत. तर उर्मिलाची फक्त एक मावशी डोंबिवलीला की कांदिवलीला कुठेतरी असते एवढी तुटपुंजी माहिती.

समीरचं नागरिकत्व भारतीय तर उर्मिलाचं  ब्रिटिश. नर्सिंग करियरचा फायदाही उर्मिलाला मिळाला होता आणि त्याबरोबरच अनेक सवलतीही.

समीरला लंडनमधे आंतर राष्ट्रीय व्यासपीठावर काम करण्याची संधी मिळत होती आणि त्याला या संधीचे फार अप्रूप वाटत होतं. आपल्या भारतातल्या कुटुंबाशी, भावाबहिणींशी व्हिडिओ कॅाल करून कधी मनाला वाटेल तेव्हा बोलायचे, वर्षातून एकदा भारतात जाऊन सगळ्यांना भेटायचं, यात समीरला खुशी असायची.

उर्मिलाला कुटुंब संस्थेचा फारच त्रोटक संबंध असल्याने तिला समीरच्या विस्तृत कुटुंबाचा हेवा वाटायचा.

जे होतं ते असं होतं आणि असंच चालणार होतं.

पण एक दिवस जरा वेगळा निघाला.

सकाळी ब्रेकफास्ट टेबलवर लीलाताई समीरला म्हणाल्या, "अरे समीर, नवीन सरकारच्या  नागरिकत्वाच्या धोरणावर नजर ठेवून आहेस नं?  'ब्रिटिश नागरिकांची बेकारी आणि परदेशी नागरिकांची घुसखोरी', या मथळ्याखाली बरंच काही बाही येतंय टी व्ही वर, पेपर्स मधे. बाहेरचे शिक्षित काय किंवा अशिक्षित काय, कोणी परदेशी नागरीक नकोच आहेत नव्या सरकारला".

"हो, ऐकतोय बरंच काही उलट सुलट या प्रश्नावर, पण काय करणार मा'म, आपण प्रवाह पतित. जिकडे प्रवाह नेईल तिकडे जावं लागणार. पण एक काळजी आहे मा'म,  बॉस मला म्हणालेत की परदेशी नागरिकांवर गंडांतर आलं तर ते माझ्यासाठी वेगळा नियम लावू शकणार नाहीत. भारतात परत जावं लागलं तर माझ्या करिअरवर वाईट परिणाम होणार आहे. आमच्या कंपनीच्या सिस्टर कंपनीची ब्रॅंच आहे भारतात, पण तिथलं काम खूपच स्थानिक स्वरुपाचं असतं. इथल्या सारखी मजा नाही त्यात".

लीलाताई ऐकत होत्या. समीरच्या मनातल्या भावना त्याच्या चेहऱ्यावरही प्रकट होत होत्या. लीलाताईंना काही बोलायचे होतं, पण त्या थांबल्या.

समीर पुढे सांगत होता, "पण मा'म, बॉस म्हणतायत, की एवढी हकालपट्टीची पाळी येणार नाही, कारण सगळ्या क्षेत्रातले बाहेरचे नागरिक इथून गेले तर देश कोलॅप्स होईल. पण ते म्हणतायत की  कदाचित इथे काम करणाऱ्या परदेशी नागरिकांना ज्या स्थानिक नागरिकांच्या बरोबरीने वेलफेअर सवलती मिळतायत, त्यांच्यात जरा काट छाट होईल. तसं झालं तर खिशाला बरीच चाट बसणार आमच्या."

मिश्किलपणे हसत समीर पुढे म्हणाला, “कदाचित इथल्या या पॉश लोकॅलिटीमधे राहणं परवडायचं नाही मला.”

“समीर मला तुझ्यासाठी एकच उपाय पुढे दिसतोय , आणि तो म्हणजे ब्रिटिश नागरिकत्व मिळवणे.” लीलाताई गंभीरपणे म्हणाल्या.

“अहो मा’म, लेट अस् बी सेन्सिबल,” समीर म्हणाला, “ब्रिटिश नागरिकत्व म्हणजे काय खिरापत आहे, की कोणी मागितलं आणि दिलं त्याला!”

“समीर, ऐक जरा,” लीलाताई म्हणाल्या, “सध्या प्रचलित असलेल्या नियमांनुसार, एखाद्या परदेशी नागरीकाने ब्रिटिश नागरिकत्व असलेल्या व्यक्तींशी विवाह केल्यास आणि काही अटी पूर्ण होत असतील तर, त्या परदेशी नागरिकाला ब्रिटिश नागरिकत्व मिळू शकतं.” लीलाताई पुढे म्हणाल्या, “हा नियम काढून टाकण्याबद्दल किंवा त्याच्या अंमलबजावणीसाठी कडक अटी ठेवण्याबद्दल सरकारवर दडपण आणलं जातंय.”

समीरने सिरिअल्सचा वाडगा बाजूला सरकवला आणि तो टोस्ट आणि स्क्रॅम्बल्ड अंड्याचा समाचार घेऊ लागला. दोन्ही कान मात्र पूर्ण उघडे होते.

“समीर, मी एक सुचवू,” लीलाताई पुढे म्हणाल्या, “उर्मिलाचं आणि तुझं एवढं छान जमतं, तर तुम्ही लग्न का नाही करून टाकत? या परक्या देशात दोघांनाही एकमेकांचा भक्कम आधार मिळेल. उर्मिला ब्रिटिश नागरीक आहे, तेव्हा पर्यायाने तुलाही ब्रिटिश नागरिकत्व मिळून जाईल आणि बरेच प्रश्न सुटतील”.

समीरने टोस्ट आणि एग्ज खाली ठेवले आणि लीलाताईंकडे आश्चर्याने तो बघतच राहिला.

———x———

# प्रकरण २

लीलाताईंनी केलेली उर्मिलाशी लग्न करण्याची सूचना समीरला विचारांची एक वेगळीच दिशा दाखवून गेली. आजपर्यंत उर्मिलाकडे समीर फक्त मैत्रीच्या दृष्टीनेच पहात आला होता. यापलीकडे त्याने दुसरा काही विचारच केला नव्हता. एवढंच नाही तर उर्मिलाच्या कुटुंबाबद्दल, तिच्या बालपणापद्दल, तिच्या विद्यालयीन - महाविद्यालयीन जीवनाबद्दल, तिच्या आवडी - निवडींबद्दल, तिच्या आजारपणाबद्दल - ॲलर्जीबद्दल समीरला काहीच माहिती नव्हती आणि अशी काही माहिती मिळवण्याची त्याला आवश्यकताही वाटली नव्हती.

अशी सर्व परिस्थिती असताना उर्मिलाशी लग्न करणे हा एक अत्यंत पोकळ विचार होता.

"मा'म, उर्मिलाकडे त्या दृष्टीनी मी कधी पाहिलंच नाही. ती कुठली, कोण, कुटुंब कुठे असतं घरी कोण आहेत याबद्दल मला काहीही माहिती तर नाहीच, पण त्याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे उर्मिलाला याबद्दल काय वाटतंय ते प्रथम पहायला हवं." समीर म्हणाला.

"विचारीन मी तिला", लीलाताई म्हणाल्या.

दुसऱ्याच दिवशी उर्मिलाला लीलाताईंनी आपल्या केबिनमधे बोलावलं.

"सिस्टर, जरा पर्सनल बोलायचंय मला. हरकत नाही ना?" हॉस्पिटल ॲडमिनिस्ट्रेटर नाईक मा'म नी सुरुवात केली.

उर्मिलाने मानेनेच हरकत नसल्याचे सांगितल्यावर मा'म म्हणाल्या, "उर्मिला, बऱ्याच दिवसापासून एक विचार घोळतोय माझ्या मनात. तुझे आणि समीर देशमुखचं एवढं छान सख्य जमलंय, तर तुम्ही लग्न का नाही करत? मी समीरला

आता दोन वर्षांपासून ओळखते. तो अत्यंत सुस्वभावी मुलगा आहे आणि तुला तो व्यवस्थित संभाळून घेईल."

"प्रश्न माझा एकटीचा नाही मा'म." उर्मिला म्हणाली. "माझ्या बरोबर सौमील सुध्दा आहे."

"ठीक आहे". लीलाताई म्हणाल्या, "पण तुझ्याकडून या प्रपोजलला हरकत नाही ना?"

"नाही मा'म", उर्मिला म्हणाली.

लीलाताईनी अर्धी लढाई जिंकली होती. उरलेली अर्धी अवघड होती, पण असाध्य नव्हती.

दुसऱ्या दिवशी सकाळी लीलाताई समीरला म्हणाल्या, "समीर, शी लाइक्स यू. शी अडोअर्स यू".

इतकी स्मार्ट, चटपटीत, हसतमुख, लाइकेबल मुलगी आपल्याला "अडोअर" करते, हे ऐकून समीर हरखून गेला. उर्मिलाकडे पहाण्याचा त्याचा दृष्टीकोन बदलून गेला.

तीन चार आठवडे गेले. दोघांचंही कामाचं वेळापत्रक अति धावपळीचं तर होतंच पण त्या दोन वेळापत्रकांना समाइक कणाच नव्हता. उर्मिलाला असायची शिफ्ट ड्यूटी, इमर्जन्सी ड्यूटी. कधी रविवारी सुट्टी तर कधी रविवार वर्किंग. समीरचेही सेमिनार, क्लायंट मीटिंग्ज, टीम मीटिंग्ज याना वेळाचा धरबंध नसायचा. देशोदेशीची घड्याळे वेगळी वेळ दाखवणार आणि समन्वय साधायचा अकाउंटिंग फर्मच्या समीरच्या लंडन ऑफिसने.

तशातही दोघं एकमेकाना भेटले. वेळी भेटले, अवेळी भेटले, ठरवून भेटले, अकस्मात भेटले, योगायोगाने भेटले. नशीब बलवत्तर की अपघाताने नाही भेटले.

एकमेकांच्या आवडी निवडींचं निरिक्षण करू लागले. आठवणींच्या कप्प्यात जपून ठेवू लागले. एकमेकाच्या वागणुकीतील सामायिक नैतिक मूल्ये टिपू लागले. हे सगळं नकळत होत असतं. त्याला वेगळे श्रम घ्यावे लागत नाहीत. दोन व्यक्तींच्या आकृष्ट होण्यातल्या अथवा दुरावा निर्माण होण्याच्या रासायनिक प्रक्रियेतल्या या अजाणतेपणानं चढलेल्या पायऱ्या आहेत.

उर्मिलाला समीरच्या कुटुंबाबद्दल फारशी माहिती नव्हती. समीरला उर्मिलाच्या कुटुंबाबद्दलच काय कशाबद्दलही माहिती नव्हती. पण सध्या ते सर्व अलाहिदा होतं. त्याना जाणून घ्यायचं होतं एकमेकाना. विवाहबध्द व्हायचं की नाही या मूलभूत प्रश्नाचं डिस्टिंक्शन मार्कांचं उत्तर लिहायचं होतं.

लीलाताईंचं लक्ष होतं. बारकाईने लक्ष होतं.

रविवारी सकाळी ब्रेकफास्ट टेबलवर लीलाताईंनी समीरला विचारलं, “काय समीर, उर्मिला भेटणार आहे का आज, की दुसरं कोणी भेटणार आहे?”

“नो..ओ, मा’म!” समीर उद्गारला. “उर्मिलाशिवाय दुसऱ्या कोणाला भेटायचं माझ्या मनातही येत नाही. व्हेरी नाइस गर्ल. तिला प्रपोज करायचंय, पण पुढे कसं जायचं ते बघायला पाहिजे.”

“घरी कळवलंयस का उर्मिलाबद्दल?” लीलाताईनी एक कॅज्युअल प्रश्न टाकला.

“नाही कळवलं मा’म, कारण ते विचारत बसतील की ही कोण, कुठली आहे वगैरे प्रश्न. आता मलाच काही माहित नाही तर मी काय सांगू त्याना?” समीर म्हणाला. “आणि तिला विचारायचा प्रयत्न केला मी एक दोनदा, पण ती एकदम फ्रीझ होऊन गेली. मला वाटतं, मा’म भूतकाळात काही मोठ्या संकटग्रस्त प्रसंगातून ती गेलेली आहे आणि त्या आठवणी नकोयत तिला.”

“खरं आहे समीर, शी हॅज सफर्ड अ लॉट”. लीलाताई म्हणाल्या. “खरं तर मीच तुमची ओळख करून दिली आहे आणि तुम्हाला एकमेकांबद्दलची माहिती कोणताही आडपडदा न ठेवता मिळेल हे मलाच पहायला पाहिजे.”

समीरने मान डोलावली.

लीलाताई म्हणाल्या, “समीर, उर्मिलाचे आई वडील लहानपणी युगांडामधे होते. अनेक भारतीय वंशाच्या कुटुंबांप्रमाणे त्या दोघांचीही कुटुंबं युगांडाहून विस्थापित झाली. ज्यांच्याकडे ब्रिटिश नागरिकत्व होतं अशांना ब्रिटनने आसरा दिला. उर्मिलाच्या दोन्ही आजोबा आजींचं ब्रिटिश नागरिकत्व होतं पण उर्मिलाचे आई बाबा ब्रिटिश सबजेक्टस होते. ठराविक कालांतराने तेही ब्रिटिश नागरिक झाले. उर्मिला इथे इंग्लंड मधेच जन्मली. उर्मिलाला मेडिकल करिअर करायची होती पण दुर्दैवाने ती शाळेच्या अखेरच्या वर्षात असताना तिने आपले आई वडील अपघातात गमावले. मग मेडिकल स्कूलला जाणं शक्यच नव्हतं. उर्मिलाने नर्सिंगचा कोर्स केला. परिक्षेत ती पहिली आली आणि माझ्या हॉस्पिटलमधे अ‍ॅप्रेन्टिस नर्स म्हणून तिची निवड झाली. तिच्या हुशारीची चमक आम्हाला सुरुवातीपासूनच दिसू लागली होती आणि जिथे काही जबाबदारीचं काम असेल तिथे उर्मिलाचं नाव पुढे यायचं. हॉस्पीटलचं टॉप सिस्टरचं बक्षिस तिला लागोपाठ दोन वर्षं मिळत आलं आहे, समीर.”

लीलाताई बोलायचे थांबल्या. समीर विचार करत होता. आपल्या स्वत:च्या कुटुंबाशी, पार्श्वभूमीशी, परिस्थितीशी सर्वांगीण तुलना त्याच्या मनात होत होती. समीरच्या बरंच लक्षात आलं होतं, आणि बरंच लक्षात येत नव्हतं.समीरला उर्मिला आवडत होती. खूप आवडत होती. तिच्या सहवासात त्याला कसं शांत शांत वाटत असे.

समीर विचार करत होता.  दोन्ही कुटुबांमधे, दोघांच्या पार्श्वभूमीमधे एवढा फरक असूनही आमचं दोघांचे कसं छान जमतंय! आवडी निवडी तर जमतायतच, आणि मुख्य म्हणजे, नैतिक मूल्यांवर, माणुसकीच्या मूलभूत तत्वांवर दोघांचाही गाढ विश्वास आहे.

पण तरीसुध्दा, काहीतरी खटकत होतं. उर्मिलाला समीर आवडत होता नक्कीच, पण मधेच काही आठवण झाल्यासारखी ती उठायची, समीरचा निरोप घ्यायची आणि चालायला लागायची.

“आणि आता, समीर बरं का, उर्मिला हॉस्पिटलच्या ऑपरेशन थिएटर समुहाची हेड सिस्टर म्हणून काम करते.” लीलाताई सांगत होत्या.

नक्कीच ही अभिमानास्पद गोष्ट होती. समीरला उर्मिलाचा अभिमान वाटत होता.

समीरचा ब्रेकफास्ट झाला होता. कॉफीचा शेवटचा घोट घेऊन त्याने कप खाली ठेवला आणि तो उठला.

“समीर, बस जरा, थोडं बोलायचंय” लीलाताई म्हणाल्या.

समीर परत खाली बसला.

“तीन वर्षांपूर्वी उर्मीला अचानक कामावर येईनाशी झाली. कोणी म्हणाले ती लग्न करून बाहेर गेली. पण नक्की काहीच कळत नव्हतं. पण नंतर सुमारे एक वर्षानंतर ती परत हॉस्पिटलमधे आली आणि माझ्या समोर उभी राहिली. मी मॅनेजिंग बोर्डकडे तिला कामावर घेण्याची शिफारस केली आणि आठवड्यांच्या आत ती मंजूरही झाली. एक वर्षभर उर्मिला कुठे होती, काय करत होती याची फारशी चौकशी केली गेली नाही. मला मात्र सावकाश सावकाश तिला विचारून सर्व माहिती काढून घ्यावी लागली, संकलित करावी लागली.” लीलाताई सांगत होत्या.

आपल्या प्रिय व्यक्तीबाबत काही वाईट साईट ऐकावं लागू नये, अशी देवाची प्रार्थना करत समीर कान देऊन माहिती डोक्यात साठवून घेत होता.

"समीर, आपल्या एकलकोंड्या जीवनाला कंटाळलेली उर्मिला भावनेला बळी पडून कोणाचीतरी सहचरिणी झाली होती. पण असं दिसतंय की हे नातं जास्त दिवस टिकू नाही शकलं. समीर, उर्मिला घटस्फोटिता आहे." लीलाताई सांगत होत्या. "आणि समीर, ते कोसळलेलं नातं मागे आपली खूण ठेवून गेलंय. उर्मिलेला एक अपत्य आहे."

कडू औषध. कुठलाही खडीसाखरेचा खडा सोबत नाही.

पण नाही कसं!! उर्मिला हाच एक मोठा खडीसाखरेचा खडा होता!!!

————-x————

# प्रकरण ३

समीरच्या मानाने उर्मिलाची कौटुंबिक पार्श्वभूमी अगदीच वेगळया प्रकारची, 'उर्मिलाचे घटस्फोटित असणे', या सत्यस्थितीला आपलेसे करणे अवघड होतं खरं. पण तेही करायला समीर तयार होता.

पण परिस्थिती त्याही पुढची होती. इतर कोणाच्या वंशाचा अंश आपल्या घरात येऊ देणे, त्याला डोक्यावर छप्पर देणे, सर्वतोपरी आपला म्हणणे वगैरे एकट्या समीरच्या खांद्यांवर पेलवणारी जबाबदारी नव्हती. त्यासाठी पूर्ण कुटुंबाचा पाठिंबा, आणि विशेषत्वे कुटुंबातल्या वडिलधाऱ्यांचा आशिर्वाद मिळणे अतिशय जरूरीचे होते, आणि सर्वप्रथम त्याचे स्वत:चे होमवर्क पक्के असायला पाहिजे होते.

पण ही सर्व फार पुढची गोष्ट होती. सर्वात प्रथम, समीरला आणि उर्मिलाला एकमेकांचे मन पूर्ण जाणून घेणं आवश्यक होतं. सतारीच्या खुंट्या पिळण्याची, सूर लावण्याची पायरी आता ओलांडली गेली होती. मुख्य महफिल आता सुरू करायची होती.

आज उर्मिलालाही साप्ताहिक सुट्टी होती. समीर आणि उर्मिला पिकॅडली सर्कस जवळच्या इटालियन बिस्ट्रोमधे लंचसाठी भेटणार होते. पण आज समीरच्या मनात, फक्त लंच साठी उर्मिलाला भेटायचं, थोड्या इकडच्या तिकडच्या गप्पा मारायच्या एव्हढाच मर्यादित कार्यक्रम नव्हता. आज त्यांचं मैत्रीचं नातं एक पाऊल पुढे टाकणार होतं.

लंचच्या दरम्यान सुरुवातीला उर्मिला जरा गप्प गप्पच होती. लीलाताईनी तिला फोन करून त्यांच्या सकाळी झालेल्या समीरबरोबरच्या संभाषणाचा  वृत्तांत

दिला होता आणि म्हणूनच की काय समीरच्या त्यावरील प्रतिक्रियेबद्दल ती साशंक होती. थोड्याच वेळात समीरने आपल्या मनमोकळ्या वागण्याने आणि सहजचतुर संभाषणाने वातावरणातलं तणावाचे आवरण पूर्ण घालवलं.

लंच संपलं. दुपारचा एक वाजला होता. आईस्क्रीमचा कोन चाटता चाटता समीर उर्मिलाला म्हणाला, “मला तुझ्या मुलाला भेटायचंय. आत्ता जमेल का?”

उर्मिलाला हे अनपेक्षित होतं. दोन क्षण ती समीरकडे पहातच राहिली. पण लगेचच तिने स्वत:ला सावरलं आणि आपल्या घरी बेबी सिटर ला फोन केला.

“जाऊ या”. फोन कॅाल संपल्यावर उर्मिला म्हणाली. “जागा आहे तो, खेळतोय मॅचबॅाक्स कारस् घेऊन. जस्ट फॅालो माय कार”

उर्मिलाचं घर थोडं लांब सबर्बमधे होतं. सुमारे तीस पस्तीस मिनिटात दोघंही तेथे पोहोचले, गाड्या पार्क केल्या. उर्मिलाचं घर छोटेखानी टुमदार होतं. पुढच्या बाजूला छोटी छोटी फुलझाडं लावली होती. उर्मिलाने बेल वाजवली. एका जमैकन दिसणाऱ्या बाईने दार उघंडलं. तिच्या मागेच छोटु उभा होता.

“बेल ऐकून धावत आला ,मम्मा मम्मा करत,” बेबी सिटर म्हणाली.

कोण आलंय हे पाहिल्यावर बाळ उड्या मारत पुढे आला आणि उर्मिलाला चिकटला.

सर्वजण लिव्हिंग रूम मधे आले आणि सोफ्यावर बसले. उर्मिलाने बेबी सिटरला घरी पाठवून दिलं. बाळ मम्माच्या मांडीवर बसून दिवसातल्या घडामोडी सांगण्याचा प्रयत्न करत होता.

“कम हिअर छोटु, कम टु मी”, समीरने बाळाला बोलावले. बाळाने थोडे समीरकडे निरखून पाहिले. समीरच्या चेहऱ्यावरचे मैत्रीचे भाव त्याला आवडले

असावेत. मम्माच्या मांडीवरून उतरून बाळ दुडदुड धावत समीरकडे आला. समीरने त्याला उचलून घेतले.

"नाव काय याचं?" समीरने उर्मिलाला विचारलं.

"सौमील". उर्मिलाने उत्तर दिलं.

"अन् आडनाव?" समीरने जीभ चालली, पण अनावधानाने प्रश्न निघून गेला होता.

"याचं आडनाव राजवाडे. माझंच मूळ नाव. पण या विषयावर मला अधिक नाही बोलायचे." उर्मिला म्हणाली.

"सॉरी", समीर म्हणाला आणि सौमीलशी गोडगोड गप्पा मारू लागला.

दुपार पुढे सरकत होती. सौमीलला झोपवायला उर्मिला आत गेली.

समीर लिव्हिंग रूम मधेच बसला होता.  मनात शब्दांची जुळवाजुळव करत होता, पण काही पटत नव्हतं. मनासारखे नाट्यमय होत नव्हतं.

उर्मिला बाहेर आली. शब्दांचं फारसं अवडंबर न करता समीर म्हणाला, "उर्मिला, विल यू मॅरी मी?"

हे उर्मिलाला अपेक्षित होतं पण असं अनपेक्षितपणे विचारलं जाईल असं वाटलं नव्हतं.

उर्मिला जवळ आली. तिने एक खुर्ची ओढली आणि समीर जवळ, समीर समोर ती बसली.

"थॅंक यू समीर. पण सौमीलचं काय?" उर्मिलाने उलट प्रश्न विचारला.

एका क्षणाचा विलंब न लावता समीर म्हणाला, "सौमील विल बी माय सन, आय प्रॉमिस उर्मिला, सौमीलला मी माझं नाव देईन. गोड गोड छोटु माझाच बाळ असणार आहे."

उर्मिलाच्या डोळ्यात पाणी आलं. ती खुर्चीवरून उठली, सोफावर समीरच्या शेजारी आली. समीरला त्याच्या प्रश्नाचं उत्तर तिने आपल्या कृतीने दिलं.

संध्याकाळचे पाच वाजत आले होते. चहा घेता घेता समीरने लीलाताईना फोन लावला. समीर आणि उर्मिला, दोघंही फोनवर बोलले. लीलाताईना गुड न्यूज सांगितली. दुपारभर विचार करून करून लीलाताई अस्वस्थ झाल्या होत्या. त्याना बातमी ऐकून खूप आनंद झाला.

घरी परतताना समीर विचार करत होता, की घरच्या लोकांना कसं सांगायचे! युगांडाच्या विस्थापित कुटुंबात जन्मलेल्या, लंडनला हॉस्पिटलमधे नर्स असलेल्या सापत्य घटस्फोटित महिलेशी आपल्या कुटुंबातला कोणी तरूण मुलगा लग्न करतोय ही सकृदर्शनी मध्यमवयी महाराष्ट्रीय आई-बाबा-काका-मामाना पटणार बाब नव्हती.

पण आता कुटुंबात वरच्या पिढीचे फारसे लोक उरले नव्हते आणि जे कोणी होते त्यात आपला आवाज चढवणारे, तरूण पिढीला जाब विचारणारे अगदीच मोजके होते.

तेवढ्यात समीरला आठवलं की दोन  आठवड्यापूर्वी अजित, त्याचा आतेभाऊ त्याला सांगत होता की अजितची आई, म्हणजे समीरची कमला आत्या, दोन महिन्यांसाठी लंडनला येणार होती. विचारून पहावं आत्या आली आहे का!

कार मधूनच समीरने अजितला फोन लावला आणि विचारलं कमला आत्याच्या लंडन व्हिजिट बद्दल.

"हो समीर, आई आली आहे मागच्या आठवड्यात". अजित म्हणाला, "पण कंटाळली आहे रे ती घरात बसून. लहानपणापासून लंडन लंडन एवढं ऐकलंय, तर आता प्रत्यक्ष इथे आल्यावर घरात नाही बसून रहायचं तिला. आणि समीर, तुला

माहिती आहे, आम्हाला दोघांना वेळ कुठे आहे? इथे वेल्फेअर स्कीम्ससाठी काम करणारे बरेच प्रोफेशनल्स तिकडे जर्मनीला, स्वीडनला मोठ्या पगारावर गेलेत, राहिलेले आमच्यासारखे जुंपले गेलेत रामरगाड्याला. आणि समीर, उद्या वसंतमामा येतायत. अमेरिकेला रमेशकडे गेले होते ते, आता परत भारतात जाताना आठवडाभर लंडनमधे उतरणार आहेत. चार दिवस सुट्टीच घ्यायला पाहिजे दोघाना लंडनमधे फिरवायला, आणि ते काही आम्हाला शक्य नाही. काय करावं ते समजत नाही''.

समीर विचार करू लागला. कमलआत्या आणि वसंताकाका, कुटुंबातले सध्याचे बोटांवर मोजता येण्यासारख्या चालत्या फिरत्या वडिल धाऱ्यांत मोडणारे. या दोघाना आपलंसं करू शकलो तर लढाई जिंकली म्हणून समजा.

''अजित,'' समीर म्हणाला, ''काळजी नको करूस भावा. त्या दोघांचं ''जीवाचं लंडन'' घडवून आणण्याची जबाबदारी माझी. माझ्यावर सोड सगळं आणि निश्चिंत रहा''.

''समीर, तू खरंच करशील मदत? थॅंक यू, थॅंक्यू समीर''. असे म्हणून अजितने फोन डिस्कनेक्ट केला.

समीरच्या मनात प्लॅनिंग सुरु झालं. एकेक पर्याय विचारात घेतले जाऊ लागले, काही टाकाऊ, काही विचारात घेण्यासारखे. चार दिवसाच्या ''लंडन देखो - फॅार ओल्ड पीपल'', या प्रोग्रॅमचा कच्चा आराखडा  घरी गाडी पोहोचता पोहोचता तयार झाला.

घरी पोहोचल्यावर त्याने उर्मिलाला फोन केला. ''उर्मिला, एक काम आहे. जरा गनिमी कावा करायचाय लढाई जिंकायला.  आमच्या कुटुंबाच्या किल्ल्याचे भक्कम बुरुज आहेत नं त्याना आतून खिंडार पाडायचंय.''

उर्मिलाला काही समजेना. मग समीरने तिला आपला डीटेल प्लॅन समजाऊन सांगितला. समीर म्हणाला, “उर्मिला, तुला आणि मला परवा पासून चार दिवस सुट्टी घ्यायची आहे. अगदी जीवन मरणाचा प्रश्न आहे. त्यामुळे एवढा वेळ काही करून काढायचाच आणि आमच्या वसंत काकांना आणि कमलआत्याला लंडनमधे फिरवायचंय. त्यांच्या मनाजोगतं साइट सीइंग करायचंय. देअर फुल सॅटिस्फॅक्शन इज अवर अेम.”

दोघांनाही सुट्टी मिळणं सोप नव्हतं. पण जरा साहेब लोकांच्या बाबा पुता करून, दोघांनीही चार दिवसांची सुट्टी मिळवली. उर्मिलाला सौमीलसाठी फुल डे बेबी सिटर ची सोय करावी लागली. समीरचंही अजित बरोबर, वसंतकाका बरोबर, कमला आत्याबरोबर बोलणं झालं. पक्कं प्लॅनिंग झालं.

मंगळवारी सकाळी  नऊ वाजण्याच्या सुमारास समीर आणि उर्मिला गाडी घेऊन अजितच्या घरी हजर झाले. काका आणि आत्याही तयारच होते. समीरने उर्मिलाची ओळख “ही माझी मैत्रीण, उर्मिला”, एवढीच करून दिली. कमलआत्याने आणि वसंतकाकानी एकमेकांकडे कटाक्ष टाकले, पण तेव्हढ्यावरच सोडून दिलं.

मंडळी निघाली. निघताना अजितने “वयपरत्वे जरा सबुरीनेच घे, आई” असा कमलाआत्याला सल्ला दिलेलं समीरने ऐकलं.

पुढचे चार दिवस समीरने आणि उर्मिलाने वसंतकाकाना आणि कमलाआत्याला लंडनभर मनसोक्त फिरवलं. बकिंगहॅम पॅलेस, टावर ब्रिज, लंडन ब्रिज, पिकॅडली सर्कस, नेल्सन मेमोरिअल, ट्यूब रेल्वे चा प्रवास थेम्स नदीवरची रिव्हर क्रूझ, ऑक्सफर्ड स्ट्रीटवर शॉपिंग सगळया सगळया लहानपणापासून उराशी बाळगलेल्या इच्छा पूर्ण झाल्या.

शेवटच्च्या दिवशी घरी आल्यावर कमलाआत्या अजितला सांगत होती, “सगळया इच्छा पुऱ्या केल्या या मुलानं आणि या पोरीनं. आता मी भारतातच काय, पण वरती जायलाही तयार आहे”.

समीरला ठाऊक होतं की, कमला आत्याकडून असे उद्गार येणे म्हणजे अगदी उच्चतम प्रशस्तीपत्रक मिळणे.

वसंतकाका समीरला एका बाजूला घेऊन म्हणाले, “समीर, या पोरीला सोडू नकोस. ही पोरगी म्हणजे बंदा रुपया आहे, बंदा रुपया. जास्त चालढकल केलीस तर हातातून सुटून जाईल तुझ्या. पटकन लग्न करून टाक हिच्याशी”.

समीरला आनंद झाला. यापुढे कुटुंबातील वडिलधाऱ्यांकडून आणखी काय परमिशन घ्यायची?

लीलाताई समीरला म्हणाल्या, “येत्या दोन महिन्यात ते नागरिकत्वाचे नियम बदलण्याचं बिल कॉमन्स मधे मांडलं जाण्याची शक्यता आहे असं मी ऐकते आहे, तेंव्हा तुमच्या लग्नाला जास्त उशीर नका लावू.

समीर आणि उर्मिलाने लग्नाची तयारी सुरु केली.

पहिलं काम म्हणजे नियमाप्रमाणे रजिस्ट्रारला एक महिन्याची नोटीस दिली.

दुसरं महत्वाचं काम म्हणजे रहायला घर बघणे. समीर लीलाताईंकडे पेईंग गेस्ट म्हणून रहात होता आणि उर्मिलाचं राहते घर खूपच लहान होतं. त्यामुळे खिशाला परवेड असं नवीन घर पहाणं क्रमप्राप्तच होतं. जरी समीर बरंचसं काम घरूनच करायचा तरी उर्मिलाचं तसं नव्हतं. त्यामुळे घर हॉस्पिटलच्या जवळ हवं होतं. विल्सडेन भागात विन्डसर रोडला त्यांना हवं तसं घर मिळालं. किमतही समीरच्या खिशाला परवडणारी होती.

समीरची आणि सौमीलची चांगली गट्टी जमली होती. सौमीलला दुजा भावाने कधीही वागवायचं नाही अशी समीरने मनोमन प्रतिज्ञा केली होती. सुरुवातीपासूनच आपल्याला “अंकल” न म्हणता, “डॅड” म्हणून हाक मारायला समीरने सौमीलला शिकवलं आणि आपला इरादा पक्का असल्याचं दाखवून दिलं.

समीर आणि उर्मिला लग्नाच्या तयारीला लागले. आमंत्रण पत्रिकेचा फोरमॅट फायनल केला, मजकूर फायनल केला. आता राहिली आमंत्रितांची यादी आणि विवाह स्थळ.

उर्मिलाचे लंडनमधे जवळचे म्हणण्यासारखे कोणी नातेवाईक नव्हते. तसं पाहिलं तर, ‘रक्ताचे नाते’ हा प्रकारच तिला माहिती नव्हता. त्यामुळे, जवळच्या पाच सहा मैत्रिणींना बोलवायचा तिचा विचार होता.

समीरचे लंडनमधे तीन चार सख्खे - दूरचे आते मामे भाऊ रहात होते. पण आपल्या वर्कोहोलिक वेळापत्रकाला प्राधान्य दिल्यामुळे समीरचे त्यांच्याशी फारसे संबंध राहिले नव्हते. नातेवाईकांपैकी सगळयात जवळचा असा अजितच. अनायासे कमला आत्याही अजितकडे आलेली होती. रात्री समीरने अजितला फोन लावला.

“वा: वा: कॅान्ग्रॅच्यूलेशन्स”, अजित बातमी ऐकून म्हणाला. “आई खूप कौतुक करते उर्मिलाचं. मी, शोभा, आई सगळेच आलो असतो रे लग्नाला, पण तारीख जमत नाही रे. त्याच आठवड्यात कॅासमॅासची टूर घेणार आहोत आम्ही, फ्रान्स आणि स्वित्झर्लंडची. आईला पण नेणार आहोत. पण आमचे बेस्ट विशेस तुम्हाला.”

आणखी दोन तीन कझीन्सकडे थोड्या फार फरकांनी हीच पुनरावृत्ती. सुट्ट्याचे दिवस त्यामुळे प्रत्येकाने काही नं काही कार्यक्रम प्लॅन केले होते. लग्नाला यायचं कोणालाच जमत नव्हतं.

समीरने भारतात वसंतकाकाना फोन केला. वसंतकाका म्हणाले, "समीर, गुड डिसिजन. गो अहेड. मी आता परत नाही त्या बाजूला एवढ्यात येऊ शकणार, पण आमचे सगळयांचे आशिर्वाद आहेत तुला.

"थॅंक यू काका" म्हणून समीरने फोन डिस्कनेक्ट केला.

लीलाताईनी पुढाकार घेतला, "फॅमिलीतलं कुणीच येत नाही", असं म्हणून नाराज न व्हायला त्यांनी समीरला समजावलं. समीरने जवळच्या मित्रमंडळींची यादी केली, कंपनीतले जवळचे सहाध्यायी त्याला जोडले. पंचवीस तीस लोकांची गेस्ट लिस्ट तयार झाली.

समीरने सगळयांना फोन केले आणि जो अभूतपूर्व प्रतिसाद सर्वांकडून आला तो समीरला थक्क करणारा होता. यानंतर समीरचं लग्न त्याची वैयक्तिक बाब राहिली नाही. मित्रमंडळाचं एक मोठं कुटुंबच तयार झालं होतं. कामं वाटून घेतली गेली. तयारीला वेग आला.

रजिस्ट्रारने अपॉइंटमेंट दिली.

लग्न व्यवस्थित पार पडलं. जल्लोशात रिसेप्शनही झालं. सगळया मित्रमंडळीनी घरचंच कार्य असल्यासारखं एन्जॉय केलं. समीरच्या काही मित्रांनी उर्मिलाच्या मैत्रिणींशी दोस्ती करण्याचा प्रयत्नही केला.

समीर विचार करत होता. कुटुंबातल्या रक्ताच्या नात्यातल्या व्यक्ती त्याच्या आयुष्यातल्या एवढ्या मोठ्या घडीला त्याला सोबत नाही करू शकल्या! कसलं हे रक्ताचं नातं? पण भारतात लग्न झालं असतं तर गोष्ट वेगळी होती. रक्ताची नाती त्या मातीत एवढी खोलवर रुजली आहेत की आपसूकच कोणी ना कोणी रक्ताचे नातेवाईक उभे राहिले असते. आम्हा परदेशात राहणाऱ्या भारतीयाना रक्ताचं नातं

आपल्या सर्व देशबांधवांशी तर जोडायला पाहिजेच, इतकेच नव्हे तर संपूर्ण मानवतेलाच या नात्याने गवसणी घालायचा पाहिजे. रक्ताच्या नात्यांची एक आगळी वेगळी व्याख्या तयार व्हायला पाहिजे.

लग्नाचे फोटो मुंबईला वसंत काका, गिरीश काका, रोहन, मनीषना व्हाटसअपवर पाठवले गेले आणि त्यांनी त्यावर छान, उत्तम चे रिमार्क्स सुध्दा दिले.

विन्डसर रोडचं घर हातात मिळालं. हवं तसं फर्निचर आणलं गेलं. समीर, उर्मिला, सौमील नवीन घरात रहायला गेले.

समीरने ठरवल्याप्रमाणे सौमीलला दत्तक घेतलं. सौमील राजवाडे बदलून त्याचं सौमील समीर देशमूख असं नाव कागदोपत्री रजिस्टर करून घेतलं. खऱ्या अर्थाने, समीर-उर्मिला-सौमील यांचं एक सुखी त्रिकोणी कुटुंब त्या घरात रहायला लागलं.

लग्न होऊन एक महिना लोटला होता. सौमील असताना कोठे हनिमूनला जाण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता. समीरच्या मनात विचार आला की लग्नाला कोणी कुटुंबीय येऊ शकले नाहीत, तर आपणच सहकुटुंब जाऊन सर्वांना भेटून यावं. उर्मिलालाही तो विचार पटला. दोघांनीही दोन आठवड्यांच्या सुट्टीचे अर्ज टाकले. सुट्ट्या सॅन्क्शनही झाल्या.

निघण्याच्या आदल्या दिवशी मात्र विघ्न आलं. महत्वाच्या मीटिंगसाठी समीरला स्टॉकहोमच्या ऑफिसमधून तातडीचे बोलावणं आलं. सर्व ग्राहकवर्ग आंतरराष्ट्रीय आणि त्यामुळे समीरचं काम म्हणजे आंतराष्ट्रीय करव्यवस्थेशी, वित्तीय बाबींशी कसरत असे.

“आधी लगीन कोंडाण्याचं, मग माझ्या रायबाचं”, असं म्हणत समीर स्वीडनला जाण्यासाठी बॅग भरू लागला.

मोठाच प्रश्न समोर उभा राहिला. सर्वांची भारताला जाण्याची तिकिटं रद्द करायची म्हणजे दंडाचे बरेच पैसे कापले जाणार. बराच विचार करून असं ठरलं की उर्मिला आणि सौमील यांनी ठरल्याप्रमाणे लंडनहून मुंबईला रवाना व्हायचं. मुंबईच्या कझिन मंडळीना उर्मिलेला एअरपोर्टवर रिसीव्ह करायला सांगायचं. उर्मिला - सौमील गिरिश काकाकडे दोन दिवस राहतील आणि मग दोन दिवसानंतर, स्टॉकहोमची मीटिंग संपवून समीर स्टॉकहोम पॅरिस मुंबई फ्लाईट घेऊन मुंबईला त्यांना जॉईन होणार.

प्लॅन केल्या प्रमाणे समीर स्टॉकहोमला गेला. उर्मिला आणि सौमील मुंबईला रवाना झाले आणि मुंबई विमानतळावर रात्री दोन वाजता गिरीश काका, रोहन, मनीष त्यांना रिसीव्ह करायला हजर होते

———x———-

# प्रकरण ४

समीरच्या स्वीडनमधल्या मीटिंग्ज लांबतच गेल्या. समीरचं आंतर्देशीय करयंत्रणेचं ज्ञान लक्षात आल्यानंतर आणखी दोन कंपन्यांकडूनही कामं मिळाली. समीरला स्टॉकहोम मधून पाय काढता येईना.

इकडे गिरीश काकाने मुंबईत एकूण परिस्थिती पाहिली. समीरचं आठवडाभर तरी येण्याचं चिह्न दिसत नाही हे ओळखलं त्याने, आणि आपल्या हातात सूत्रं घेतली.

‘चला महाबळेश्वर ट्रीपला.’

गिरीशकाकानी पुढाकार घेतल्यावर बाकीचे कसे मागे राहतील!

रोहनने महाबळेश्वरचं हॅाटेल बुकिंग केलं. मनीषने वीस सिटर बस बुक केली. गिरीश काकाच्या नेतृत्वाखाली फॅमिली निघाली चार दिवसांच्या महाबळेश्वर ट्रीपला. पुण्याला रहाणाऱ्या डॅाक्टर सुषमा, रेखा या आतेबहिणी आणि त्यांचे मिस्टर, ही डॅाक्टर कुटुंबं पुण्याला सातारा रोडवर जॅाईन झाली.

महाबळेश्वरला चार दिवस खूप मजा आली. उर्मिलाला सर्वांनी आपल्याबरोबर सामावून घेतलं. छोट्या सौमीलचे तर खूपच लाड झाले.

लंडनमधे उर्मिलाचा मित्रमंडळीचा फार मोठा गोतावळा कधीच नव्हता. चार पाच जवळच्या जिवाभावाच्या मैत्रिणी हाच तिचा मित्रपरिवार. कुटुंबीयांबरोबर वावरण्याची तिला सवयच नव्हती.

उर्मिला पहात होती. समीरच्या कुटुंबियांचं एकमेकाशी खेळीमेळीने वागणं, कधी रुसवे, कधी फुगवे. जुन्या, तीस चाळीस वर्षांपूर्वीच्या आठवणींना उजाळा देत,

भूतकाळात रमून जात शेकोटी भोवती गप्पागोष्टींचा फुलोरा उभा करणं, एकमेकाच्या दुखल्या खुपल्याची काळजी घेणं, सगळाच एक आगळा अनुभव. सगळीच मजा. आणि कुटुंबाच्या उबदार कवचाखाली पूर्ण सुरक्षिततेची जाणीव.

मुंबईला परत येईपर्यंत उर्मिला कुटुंबामधे पूर्ण सामावून गेली. सर्वांचं सुख, दु:ख, आनंद आपलं समजू लागली. आणि बसने परत मुंबईला येताना नेमके याच गोष्टीचं उर्मिलेला राहून राहून आश्चर्य वाटत होतं. कोण आहेत हे लोक आणि काय नातं आहे आपलं त्यांच्याशी! ही मंत्र मंडळी तर नाहीतच. यांच्याशी आपलं रक्ताचं नातंही नाही. पण हे माझे कुटुंबीय आहेत. हे कुटुंबाचं नातं आहे. हे रज्जू, या गाठी वेगळयाच धाग्यांनी बनलेल्या आहेत. हे माझं कुटुंब आहे. या सर्वांशी माझं एकच नातं आहे. कौटुंबिक नातं. बाकी कुठल्याही नात्यांपेक्षा भक्कम नातं. या नात्याने सौमील सुध्दा बांधला गेला होता. कोठलाही प्रश्न, कोठलाही किंतू न उभा करता या कुटुंबाने त्याला आपल्यामधे समाविष्ट करून घेतलं होतं.

दोन आठवडे होत आले. उर्मिलाची सुट्टी संपत आली होती आणि परत जाण्याच्या फ्लाईटची तिकिट ही बुक्ड होती. तेव्हा समीरच्या येण्याची फारशी आशा न धरतां उर्मिलाने आपला भारत दौरा आटोपता घेतला आणि खूपशा गोड आठवणी सोबत घेऊन, खूपशा गोड आठवणी मागे ठेवून उर्मिला आणि सौमील मायदेशी इंग्लंडला परतले.

समीरही त्याच्या स्वीडन मधल्या मीटिंग्ज आटोपून दमूनभागून त्याच आठवड्यात घरी परतला.

दिवस जात होते.

वर्षभरातच चेतनचा जन्म झाला.

अगदी पाळण्यात असल्यापासून चेतनला आपल्या मोठ्या भावाचं, सौमीलचं आणि सौमीलला छोटु चेतनचं फार प्रेम. दादा जेव्हा शाळेत जायला लागला तेव्हा चेतनही त्याच्याबरोबर शाळेत जायला मागे लागत असे. त्याला घरी सोडून जायचं दादालाही जिवावर यायचं.

चेतनही मोठा झाला. तोही शाळेत जाऊ लागला. समीरने दोन्ही मुलांमधे कधीच डावं उजवं केलं नाही, कुठल्याही प्रकारचा भेदभाव केला नाही. पण जसजशी मुलं मोठी होऊ लागली तसतसे त्यांच्या व्यक्तिमत्वातले फरक जाणवायला लागले, शारिरिक फरक दृष्टीला दिसू लागले. आवडी निवडी, मनातले विचार प्रकट करण्याची पध्दत यातलं वेगळेपण स्पष्ट कळू लागलं. दोन विभिन्न व्यक्तींमधे वेगळेपणा असणं गैर नाही हे समीर आणि उर्मिला जाणून होते. त्यामुळे या वेगळेपणांकडे जास्त लक्ष न देता दोघांच्या मनावर चांगले संस्कार करण्याकडे त्यांनी पूर्ण लक्ष दिलं.

सौमीलला जीवशास्त्र, प्राणीशास्त्र या विषयांमधे गोडी होती, तर चेतनला गणित, अर्थशास्त्र कॅाम्प्युटर या विषयात जास्त रस होता.

सौमीलने ठरवून टाकलं होतं की मी डॅाक्टर होणार, तर चेतनच्या मनात डॅडींसारखं आंतर्देशीय आर्थिक देवाण घेवाण, करव्यवस्था यात निपुण व्हायचं होतं.

सौमीलचं स्कूल ग्रॅज्युएशन झालं. त्याला अतिशय उत्तम ग्रेड्स मिळाल्या आणि त्या जोरावर त्याला केम्ब्रीज युनिव्हर्सिटीच्या ट्रिनिटी हॅाल मेडिकल कॅालेजमधे अॅडमिशन मिळाली.

सौमील डॅार्मीटरीमधे रहायला गेला. सहा वर्षांचा लांबलचक कोर्स, पण आनंदाने, उत्साहाने, जोमाने सौमील अभ्यासाला लागला.

चेतन शाळेत होता. त्याला आपल्या दादाचा फार अभिमान वाटायचा.

तीन वर्षं गेली. सौमीलला त्याच्या परिश्रमांच्या जोरावर मनाजोगती प्लेसमेन्टही मिळाली.

चेतनचं स्कूल ग्रॅजुएशनही उत्तम रीतिने पार पडलं. आपल्या दादाला तोडीस तोड ग्रेड्स त्याला मिळाल्या. त्यालाही केम्ब्रीजला त्याच्या आवडणाऱ्या कोर्सला, कॉम्प्युटर सायन्स व फायनान्स मॅनेजमेंटला, ॲडमिशन मिळाली.  आता दोन्ही मुलं कॉलेजच्या डॉर्मीटरी मधे गेली. दोघांचाही अभ्यास जोरात सुरू झाला.

दर आठवड्याच्या शेवटी, वीकएन्डला, आणि नाहीच जमलं तर पंधरवड्याला घरी येण्याचा परिपाठ मुलांनी ठेवला. एकत्र बसून आठवड्यात - पंधरवड्यात घडलेल्या गमती जमती, घडामोडी एकमेकाना सांगायच्या, मजेत दिवस घालवायचा साधा परिपाठ.

चौघांची कार्यक्षेत्रे वेगळी, व्यावसायिक सगेसंबंधी वेगळे, मित्रमंडळ वेगळं. पण  तरीहि एकमेकांना, चौघाना कुटुबांच्या धाग्याने घट्ट बांधलेलं. एक कुटुंब, चौकोनी कुटुंब. चार भिंतींच्या आत सुखरूप. या कुटुंबाला इतर नाती नव्हती. त्यांच्या सुख दु:खात कोणी वाटेकरी नव्हता, कोणाच्या सुखदु:खात त्यांची भागीदारी नव्हती. कुणाशी रक्ताची नाती नव्हती, की या कुटुंब रूपी बेटाचा कोणत्याही विस्तारित कुटुंबाशी संबंध नव्हता. एस्कीमोच्या इग्लू सारखं सर्व बाजूंनी बंद कुटुंब

————x———-

# प्रकरण ५ .

एका वीक एन्डला असंच रात्री मंडळी एकत्र डिनर घेत होती. हलक्या फुलक्या गप्पा चालल्या होत्या.

सौमील म्हणाला, “मागच्या आठवड्यात एक अजब घटना घडली डॅड. ए स्ट्रेंज इन्सिडेंट”

“काय झालं काय?” समीरने विचारलं.

“डॅड, बुधवारी युरॅालॅाजीचा क्लास घ्यायला ऑनररी प्रोफेसर डॅाक्टर मराठे आले होते. मी आपला नेहमीप्रमाणे फ्रंट बेंच वर बसलो होतो, मन लावून ऐकत होतो. त्याना ते बहुतेक आवडलं असावं कारण ते नंतर जवळ जवळ मलाच समजावल्यासारखं लेक्चरची डिलिव्हरी करु लागले. लेक्चर संपल्यावर आम्ही थॅंक यू म्हणायला त्यांच्याजवळ गेलो, तेव्हा मला नाव विचारलं. मी सांगितलं. त्यावर पुढचा प्रश्न, आर यू सिस्टर उर्मिलाज सन? डॅड आय वॅाज शॅाक्ड. मी पहातच राहिलो. तेव्हढ्यात त्याना कोणीतरी बोलावलं आणि सर निघून गेले. स्ट्रेंज, नाही का डॅड?”

सगळेच ऐकत होते, विचार करत होते.

तेव्हढ्यात उर्मिला जरा मोठ्या आवाजात म्हणाली, “डॅाक्टर मराठेपासून दूर रहा सौमील, तो चांगला माणूस नाही”.

फारसा कधी आवाज न उठवणाऱ्या उर्मिलाकडे सगळेचजण चपापून पहायला लागले.

उर्मिला काही वेळ खाली पहात प्लेटमधला भात चिवडत राहिली आणि नंतर आपली प्लेट उचलून ती किचनकडे निघून गेली. बाकी सर्वजणानी शांतपणे

आपलं जेवण उरकलं. मुलं जेवण संपवून वर आपापल्या खोल्यांकडे निघून गेली आणि समीरने किचनमधे जाऊन न बोलता उर्मिलाला आवराआवरीला मदत केली आणि मग तो हॉलमधे जाऊन बसला.

थोड्या वेळाने उर्मिला सुध्दा हॉल मधे आली आणि स्वस्थपणे सोफ्यावर बसून राहिली. मग समीरनेच विषय काढला.

“उर्मिला, मघाशी डॉक्टर मराठेंच्या विरूध्द तू एवढं वाईट मतप्रदर्शन का केलंस? तू त्याना ओळखतेस का? आधी तुला कुठे भेटलेत का ते?” समीरने विचारलं.

उर्मिला थोडावेळ काहीच बोलली नाही. जणू मनातल्या खळबळीला बांध घालण्याचा ती प्रयत्न करीत होती. मनाला कोणत्यातरी निर्णयाप्रत आणण्याचा ती प्रयत्न करत असावी. मन थोडं शांत झाल्यावर समीरकडे वळून उर्मिला म्हणाली, “डॉक्टर मराठे सौमीलचे बायॉलॉजीकल वडील आहेत, खरे वडील.”

समीरला हे अगदीच अनपेक्षित होतं.

“डॉक्टर मराठे? त्यांच्याशी पहिलं लग्न झालं होतं तुझं? पण कोणालाच कसं काही माहिती नाही!” समीर ने विचारलं.

“डॉक्टर मराठेंशी नव्हतं आणि इतर कोणाशीही नव्हतं.” उर्मिला म्हणाली, “माझं कोणाशीही लग्न झालं नव्हतं. जेव्हां डॉक्टर मराठे सिटी हॉस्पिटलमधे युरोसर्जन होते तेव्हां मी त्याना सर्जरी मधे असिस्ट करत असे. ऑपरेशन थिएटरच्या बाहेरही आमची चांगली दोस्ती होती. बऱ्याच जणांना ते माहिती होतं, पण कितपत चांगली, कितपत जवळची, ते नव्हतं कोणाला माहिती. दिवाळीच्या सुमारास आमची एंगेजमेंट पब्लिकली जाहीर करायचं आमचं ठरलं होतं. तेवढ्यात डॉक्टर मराठेना सुमती भेटली. सुमतीचे वडील डॉक्टर मराठेना सुसज्ज यूरो क्लिनिक

उभारून द्यायला तयार होते. झालं. डॉक्टर मराठे भुलले. मला जस्ट कोरडा ‘बाय’ केला, सिटी हॉस्पिटलही सोडलं आणि सुमतीशी एंगेजमेंट केली.  लवकर मला सौमीलची चाहूल लागली. पण वेळ निघून गेली होती. डॉक्टर मराठेंचं सुमतीशी लग्न झालं होतं. त्यांचं सुसज्ज प्रायव्हेट युरोक्लिनिक कार्यान्वित होत होतं.”

थोडं थांबून उर्मिला पुढे म्हणाली, “सिनेमातल्यासारखं मुलाला कडेवर घेऊन समारंभात टपकणं आणि तमाशा करणं खऱ्या जीवनात शक्य होत नाही. सोंगट्यांच्या खेळासारखं ज्याला दान पडलं नाही त्याने मुकाटयाने बाजू होण्यातच त्याचं हित असतं. मी तेच केलं. स्वत:च्या हिंमतीवर सौमीलला वाढवण्याचा प्रयत्न केला. तेवढ्यात तू धावून आलास आणि आज सौमीलला जगात मानानं जगता येतंय.”

समीरने उर्मिलाला जवळ घेतलं. तिचे हुंदके थोपटून थोपटून शांत केले. पुढे कोणीही काहीही बोललं नाही. उर्मिलाला सावरत समीरने बेडरूम मधे नेलं आणि दोघांनीही गादीवर पडून डोळे मिटले. बराच वेळ दोघं जागे होते. ऐकलेल्या सत्यकथेवर समीर विचार करत होता. उर्मिलाबद्दलची कणव त्याच्या मनात ओतप्रोत भरली होती.

उर्मिला जरा पुढचा विचार करत होती. डॅक्टर मराठेंची आणि सौमिलची भेट तर झाली होती. त्या हुशार माणसाला सौमिलच्या जन्मतारखेवरून सगळा इतिहास लख्ख दिसायला वेळ लागणार नव्हता. पुढे काय? डॉक्टर मराठे पुढची काय पावले घेतील! सगळंच भविष्य अदृष्टात सामावलेलं.

समीरला सगळा इतिहास एकदाचा सांगून टाकल्यावर उर्मिलाला मोकळं मोकळं वाटत होतं. जे विदारक सत्य आजवर असत्याच्या आवरणाखाली लपून बसलं होतं ते समीर पुरतं तरी बाहेर आलं होतं. इतर कोणाला ते सांगण्याचा संबंधही

नव्हता. घरात सुध्दा त्या रात्री सौमील आणि चेतन आपापल्या खोल्यांमधे अभ्यासात व्यग्र असल्याने त्यानाही कशाचा थांगपत्ता लागला नाही. एक मात्र निश्चित, आपल्या मम्माचा डॉक्टर मराठेंबद्दलचा दूषित ग्रह सौमिलच्या लक्षात आला.

सौमिलची मेडिकल ग्रॅज्युएशन कडे वाटचाल चालू होती. क्लास रूम लेक्चर्स, क्लिनिक्स, हॉस्पिटलची शिफ्ट ड्यूटी या सगळयातून महिन्यातून एक वीकएन्ड घरी सर्वांबरोबर घालवतां येणंही अवघड व्हायला लागलं.

ऑनररी प्रोफेसर डॉक्टर मराठे मधून मधून लेक्चरला येत असत. लेक्चरसंबंधीत बोलणं, प्रश्नोत्तरं, शंका निरसन, यासाठी सौमीलबरोबर त्यांचे बोलणं होत असे. पण अवांतर संभाषण कधीही नसायचं. तरीही, का कोण जाणे, सौमीलला इतर विद्यार्थ्यांपेक्षा डॉक्टर मराठे आपल्याशी जास्त आपुलकीने बोलतात असं जाणवायचं. सौमीलला त्यांचा खूपच आधार वाटायचा. मनाला बरं वाटायचं. फार पूर्वी डॉक्टर मराठे सिटी हॉस्पिटल मधे होते आणि मम्माला ते ओळखत होते हे सौमिलच्या लक्षात आलं होतं, पण ही गोष्ट त्याने तेवढ्यावरच सोडून दिली. काही का असेना, अटीतटीची स्पर्धा असलेल्या ग्रॅज्युएट मेडिकल कोर्समधे एवढा तरी भक्कम आधार आपल्याला मिळतोय या जाणिवेने सौमिल खुष होता. हीच त्याच्या हातातली मोती माणकं होती आणि ती सांभाळणं अतिशय महत्त्वाचं होतं.

---—x——

# प्रकरण ६

धाकट्या चेतनचा  कॅाम्प्यूटर विषयाचा अभ्यास चांगला चालला होता. त्याची विषयांबद्दलची समज, न समजलेला भाग नीट समजून घेतल्याशिवाय पुढे न जाण्याची वृत्ती,  नंबर्सचा आणि हिशोबाचा खेळ सहजपणे खेळण्यातले कौशल्य, सारे सारे पाहून समीरला चेतनमधे आपले स्वत:चे प्रतिबिंब दिसत असे. याच आनंदाच्या भरात झालेल्या हर्षोन्मादाच्या क्षणी त्याच्या तोंडून अस्फुट शब्द निघत असत, “शेवटी रक्ताचे नाते ते रक्ताचे नाते.”

चेतन कॅाम्प्यूटर सायन्स व फायनान्स मॅनेजमेंट मधे ग्रॅज्युएट झाला. नंतर समीरच्या मार्गदर्शनाखाली आंतर राष्ट्रीय कर व्यवस्था व व्यापारी करार या विषयांमधे तो पदव्युत्तर परीक्षा चागल्या ग्रेड्सनी पास झाला.

चेतनने आपल्याच कंपनीत जॅाईन व्हावे अशी समीरची इच्छा होती. चेतनने अर्ज केला, त्याची निवड झाली आणि  तीन महिन्याचा ओरिएंटेशन कोर्स सुरू झाला. अशा ओरिएंटेशन कोर्सच्या दरम्यान कंपनी व्यवस्थापकांचे या नवागतांवर बारीक लक्ष असते. प्रत्येकाचे कौशल्य, त्याची विशिष्ट विषयाची आवड नावड, काम करण्याच्या, समजून घेण्याच्या मर्यादा बरोबर लक्षात घेतल्या जातात आणि त्या अनुमानांना अनुसरून त्या नवागतांपैकी कामाला ठेवायला कोण लायक आहे, कोणाची लायकी कमी पडते, कोणत्या विभागामधे काम देणे उचित ठरेल हे सर्व ठरवले जाते.

चेतनचा तीन महिन्यांचा ओरिएंटेशन कार्यक्रम संपतां संपतां त्याच्या हातात कंपनीचा अपॅाइंटमेंटचा खलिता पडला.

“डॅड, हे बघा कंपनीचं अ‍ॅपॉइंटमेंट लेटर.” तो खलिता हवेत फडफडावत चेतन म्हणाला.

“डॅड, अ‍ॅपॉइंटमेंट मिळाली खरी, पण पोस्टिंग जिनिवा, स्वित्झरलंड इथलं दिलंय. डॅड, एवढं लांब एकट्याने जाऊन रहायचं आणि काम करायचं कठिण वाटतंय मला. त्यातून टूरिंग वगैरे असलं तर आणखी अवघड. डॅड, त्याना, असं सांगू या का, की सिलेक्शन बद्दल  थॅंक यू , पण लंडनमधे पोस्टींग द्या? तुम्हाला जमेल का काही रदबदली करायला? का डॅड, तुमचं पण पोस्टींग जिनिवाला करून घेता तुम्ही? म्हणजे, मग आपण सगळे एकत्र राहू!”

चेतन अगदी काकुळतीला येऊन बोलत होता.

समीरला मनातून आनंद होत होता. शेवटी रक्ताचं नातं ते रक्ताचं. आणि सौमील बघा, महिना झाला, पत्ताच नव्हता. फोन करायचा मधुन मधुन पण घरी येणार का वीक एन्डला म्हटलं तर कधी इमर्जन्सी ड्यूटी आहे असं सांगायचा कधी ट्रॉमा केस आहे म्हणून सांगायचा. महिना गेला होता असाच.

समीरने चेतनच्या हातातून अ‍ॅपॉइंटमेंट लेटर घेतलं. चेतनला खाली बसवलं. तेवढ्यात उर्मिला बाहेर आली. समीरने उर्मिलावर चेतनला शांत करायचं काम सोपवले.  मग समीरने ते लेटर नीट वाचलं, दोनदा वाचलं. जरा बाजूला जाऊन एकदोन फोन कॅाल केले.

चेतन आणि उर्मिला बोलत होते. चेतन बराचसा शांत झाला होता.

“चेतन, कॅान्ग्रॅच्युलेशन्स. कंपनीने फार चांगली पोस्ट ऑफर केली आहे तुला”. समीर म्हणाला. “जिनिवा म्हणजे युरोपातलंच नाही तर जगातलं मोठं आर्थिक उलाढालींचे केन्द्र. तिथे कित्येक मोठ्या बॅंक्सची हेड ऑफिसेस आहेत, इन्शुअरन्स कम्पन्यांची हेड ऑफिसेस आहेत. जगभरातल्या फायनान्सिंग,

इन्शुअरन्स, री-इन्शुअरन्सच्या उलाढाली इथून चालतात. अशावेळी जागतिक करव्यवस्था, जागतिक व्यापार करार यावर फार लक्ष ठेवावे लागतं, नाहीतर काही मिलियन यूरोचं नुकसान होऊ शकते . आपल्या कंपनीचे एच आर हेड, मिस्टर रॉबिन्सन म्हणतायत की जिनिवाची टीम अतिशय चोखंदळपणे निवडली आहे आणि ते म्हणतायत की तुझ्या नावाची शिफारस सगळ्याच विभागीय प्रमुखांनी केली आहे. तेव्हा चेतन, मला काय वाटतं, की हे पोस्टींग तू स्वीकारावस."

उर्मिला ऐकत होती. "हवं तर सुरुवातीचे काही दिवस मी जाऊन राहीन चेतन बरोबर जिनिवाला, त्याचं बिऱ्हाड सेटल करून द्यायला." उर्मिला म्हणाली.

समीर म्हणाला, "मिस्टर रॅाबीन्सन म्हणतायत की टीमच्या सगळ्या सुखसोईंकडे व्यवस्थित लक्ष पुरवलं जाणार आहे. जिनिवाच्या आपल्या पार्टनर कंपनीबरोबर तसा लेखी करारच करून घेतला आहे. मिस्टर रसेल तिथले एच आर चीफ आहेत. ते जातीने लक्ष घालणार आहेत."

उर्मिलाचं समाधान झालं. वरकरणी ती शांत झाली खरी , पण चेतन इतक्या लांब, स्वित्झरलंडला जाणार म्हणजे दुरावणार ही जाणीव तिला मनोमन झाली होती.

आठ दिवसातच चेतनची टीम स्वित्झरलंडला रवाना झाली.

समीरने ऑफिस मधून आणि उर्मिलाने घरून चेतनला शक्य तेव्हढा आधार दिला. रोज किंवा दिवसाआड फोन कॅाल व्हायचेच. इंग्लंडच्या टाईम मधला आणि स्वित्झर्लंडच्या टाइम मधला फरक चेतनच्या सोईनुसार लक्षात घेतला जात असे.

हळू हळू चेतन तिथे चांगलाच रुळला. आठवड्या नंतर हॅाटेल ला राम राम ठोकून सर्वच टीम मेट्सनी कंपनीच्या मदतीने रहाण्याची आपापली सोय करून घेतली.

एक महिन्यानंतर एका एक्सटेंडेड वीक एंडचा फायदा घेऊन चेतन घरी लंडनला आला. उर्मिलाने आणि समीरने त्याचं खूप कोडकौतुक केलं. उर्मिलाने त्याला बरोबर नेण्यासाठी छानसं पार्सल पॅक केलं. रविवारी दुपारी चेतन स्वित्झरलंडला परत गेला.

चेतनच्या कामाचा व्याप बराच वाढला. टेलिफोन कॅाल्स जेमतेम आठवड्यातून एकदा व्हायला लागले, आणि तेही जेमतेम एक दोन मिनिटांचं संभाषण.

दोन महिन्यांनंतर चेतनने पुन्हा लंडनची ट्रिप केली. कामाबद्दल बोलणे झालेच पण ट्रेकिंग ट्रिप्स, स्किइंग बद्दल त्याला बरंच काही सांगायचे होतं. ट्रेकिंग साठी त्यांचा म्हणे खूप छान ग्रुप जमला होता आणि बऱ्याच ट्रेकिंग ट्रेल्स त्यांनी पालथ्याही घातल्या होत्या.

“डॅड, घाईत आहे जरा, अपार्टमेंटमधे शिफ्ट होतोय”, सहा महिन्यांनंतर फोनवर चेतन सांगत होता.

“अपार्टमेंट? पण भाडं परवडेल नं? कोणी रूम मेटस् वगैरे आहेत का बरोबर?” समीरची रास्त शंका

“डॅड, क्रिस्तीना आहे माझ्या बरोबर, माझी ट्रेकिंग पार्टनर”, चेतनचं उत्तर, “इक्वल शेअरिंग करणार आहोत आम्ही”.

“ठीक, वेळ मिळेल तेव्हा सांग डीटेल,” समीरची बापुडवाणी प्रतिक्रिया.

दिवस जात होते.

चेतनचा फोन, “डॅड, क्रिस्तिनाला जॉब मिळालाय. आर्किटेक्ट आहे नं ती! वर्षाभरात सबर्बमधे घर घेता येईल आम्हाला.”

यावर समीरला काहीच भाष्य सुचेना.

तिकडे सौमीलकडे वेगळ्याच घडामोडी चालल्या होत्या.

सौमीलचं मेडिकल ग्रॅज्युएशन जवळ आलं. पेपर्स, लेखी परिक्षा, क्लिनिकल टेस्ट, तोंडी परीक्षा सर्वच छान झालं होतं. आपल्याला चांगली ग्रेड मिळणार याबद्दल सौमीलला खात्री होती.

समीर, उर्मिला, सौमील वीक एन्डच्या लंच नंतर हॉल मधे बसले होते.

“सौमील, ग्रॅज्युएशन नंतर पुढे काय करायचं ठरतेय तुझं?” समीरने विचारलं. “पोस्ट ग्रॅज्युएटला रजिस्ट्रेशन करायचा विचार आहे नं?”

“येस डॅड”, सौमील म्हणाला. “पण मला नुसतं क्लिनिकल काम करत बसायचं नाही. सर्जरीमधे मला जास्त इंटरेस्ट आहे. जनरल सर्जरी घ्यावं म्हणतो मी, यूरो सर्जरी, न्यूरो सर्जरी, कार्डिओलॉजी वगैरे सुपर स्पेशालिटीज घेतल्या तर त्या एकाच क्षेत्रात अडकुन पडायला होईल असं मला वाटतं. म्हणून जनरल सर्जन होणं मला जास्त आवडेल, डॅड”.

“विचार ठीक दिसतोय, पण तुझ्या सिनिअर डॉक्टर्सचं मत पण आजमावून पहा”. समीरचा सल्ला.

सुदैवाने सर्व मनासारखे झालं आणि सौमीलला सर्जरी साठी रजिस्ट्रेशन मिळाले. निष्णात तज्ञ सर्जनना अवघड ऑपरेशन मधे तो असिस्ट करू लागला. एक विश्वसनीय आणि जबाबदारीने काम करणारा असिस्टंट म्हणून सौमील सिनिअर सर्जन्सचा आवडता झाला.

एफ आर सी एस झाल्यानंतर पोस्टिंगसाठी सौमीलला मुळीच चिंता नव्हती. ऑफर्स त्याच्या हातात होता.

समीर आणि उर्मिलाला सौमीलच्या यशाचा अभिमान वाटत असे आणि ते देवाकडे एवढीच प्रार्थना करत असत की , 'देवा अगदी यशाच्या शिखरावर पोहोचल्यावर सुध्दा सौमिलच्या मनात विनम्र भाव असू दे'.

सौमील सांगत होता, "डॅड, एफ आर सी एस हातात मिळाल्यावर मी माझ्या सगळ्या सिनिअर प्रॅक्टिशनरना जाऊन भेटलो आणि थॅंक्स दिले. डॉक्टर मराठेंनाही भेटलो डॅड. हार्ले स्ट्रीट वर त्यांचे मोठं कन्सल्टिंग ऑफिस आहे आणि शिवाय एक युरॉलॉजिकल स्पेशलायझेशनची फॅसिलिटी आहे.".

समीर आणि उर्मिला ऐकत होते.

सौमील पुढे सांगत होता, " 'माझे दरवाजे तुझ्यासाठी कायम उघडे आहेत', असं म्हणाले डॉक्टर मराठे. आणि डॅड, धिस इज इन्टरेस्टिंग. ते पुढे म्हणाले, 'लक्षात ठेव सौमील, माझ्याकडून तुला तुझ्या एक्सपेक्टेशन पेक्षा केव्हाही जास्तच कॉम्पेन्सेशन मिळेल'. "

समीर आणि उर्मिला ऐकत होते. 'चला, हा मुलगा पण आपल्या हातातून चालला', हाच विचार दोघांच्याही मनात आला.

'रक्ताचं नातं हातात टिकवता आलं नाही आपल्याला, तर हे ओढून ताणून आणलेलं नातं काय टिकणार', असा कडवट विचारही समीरच्या मनात ओझरता येऊन गेला.

"पण तुम्हाला माहिती आहे डॅड, कामाच्या लठ्ठ मोबदल्यापेक्षा माझ्या मेडिकल प्रॅक्टिस द्वारे मला मिळणाऱ्या लोकांच्या आशिर्वादाना माझ्या दृष्टीने जास्त महत्त्व आहे. मला डॉक्टर मराठेंच्या गलेलठ्ठ कॉम्पेन्सेशनच्या लोभात अडकायचंच नाही".

समीर आणि उर्मिलानी एकमेकांकडे कटाक्ष टाकले.

"सौमील तू सिटी हॉस्पिटलचा का नाही विचार करत?" उर्मिलाने विचारले. "तुला हवं तसं कामाचं समाधान आणि सेवाभावाचं वातावरण तिथे तुला नक्कीच मिळेल. पण मलाही सिटी हॉस्पिटल सोडून बरेच दिवस झालेत. लीलाताईना लेटेस्ट माहिती असेल. आपण त्यांना विचारू या का?"

समीर आणि सौमीलची मूक सम्मती मिळाल्यावर उर्मिलाने लीलाताईंना फोन लावला.

लीलाताईही काही वर्षांपूर्वी सिटी हॉस्पिटलमधून निवृत्त झाल्या होत्या आणि सध्या त्या त्यांच्या मुलीच्या जवळ लिव्हरपूलला रहात होत्या.

उर्मिलाचं बोलणं ऐकून घेतल्यावर लीलाताई म्हणाल्या, "असं बघ उर्मिला, लंडनशी आणि सिटी हॉस्पिटलशी आता माझा फारसा संबंध उरला नाही, पण इथे लिव्हरपूलमधे सौमीलला पाहिजे तशी फॅसिलिटी नुकतीच सुरू झाली आहे. इथे जॉब घ्यायला सांग त्याला. पोझिशन्स आहेत ओपन सध्यातरी".

लीलाताईंचे आभार मानून उर्मिलाने फोन बंद केला.

लिव्हरपूलच्या हॉस्पिटलबद्दलची ही माहिती नवीनच होती. सौमीलने चार लोकांना विचारून लीलाताईंच्या सांगण्याची खातरजमा करून घेतली. जे काही ऐकलं ते सर्व दृष्टीनी चांगलंच होतं. सौमीलने लिव्हरपूलच्या हॉस्पीटल कडे ई मेल ने अर्ज पाठवला , आणि चार दिवसात तिथल्या नियुक्तीचं पत्र त्याला ई मेलने आलं. कामाचे स्वरूप, कामाच्या वेळा, पगार, फी, मानधन, रहाण्याच्या क्वार्टर्स याबद्दल पूर्ण माहिती त्यांनी दिली होती. सौमीलने सर्व नीट वाचलं, मान्य केलं आणि पुढच्याच आठवड्यात कामावर रुजू होण्यासाठी तो लिव्हरपूलला रवाना झाला.

———x———-

# प्रकरण ७

इकडे समीर आणि उर्मिला घरी पूर्ण एकटे पडले. एरवी वीक एन्डला मुलांपैकी कोणी येण्याची शक्यता असायची, तीहि आता पूर्ण मावळली.

लिव्हरपूलचं हॉस्पिटल सौमीलला आवडलं. काम भरपूर असायचं, तरी रोज संध्याकाळी घरी फोन करण्याचा परिपाठ त्याने ठेवला होता. एव्हढ्या लांबहून, लिव्हरपूलहून लंडनला दर वीक एन्डला येण्यात पॉइंट नव्हता. इमर्जन्सी केसेस, ट्रॉमा केसेसही असायच्या, वीक एन्ड खाऊन टाकायच्या.

सहा महिने झाले होते. ईस्टर हॉलिडेज होते. समीरला आणि उर्मिलाला खात्री होती की मुलं दोन तीन दिवसांसाठी तरी येऊन जातील.

चेतनचा फोन आला. "डॅड, ईस्टर सनडे फीस्टला ख्रिस्टिनाच्या मॉमनी बोलावलंय त्यांच्या घरी झुरिकला. लंडनला यायला नाही जमायचं यावेळी. आय ॲम सो सॉरी डॅड".

चेतन काही फार सॉरी असल्याचं त्याच्या बोलण्यावरून वाटत नव्हतं, पण समीरने ते सोडून दिलं.

सौमील तरी येणारच. तसा काही फार लांब नव्हता तो. न यायला काही कारण दिसत नव्हतं.

पण सौमीलचा फोन आला, "डॅड, ईस्टर हॉलिडेज मधे नॉर्थ यॉर्कशायरच्या टूरला जाणार आहोत आम्ही. तिथली ऐतिहासिक ठिकाणं बघायचीत. सीझन पण चांगला आहे. मजा करू."

" सेफ रहा बाळा. कोणी आहे का टूरला तुझ्याबरोबर?" उर्मिलाचा प्रश्न.

“चौघेजण आहोत मम्मा, मी,  इथला अनेस्थेटिस्ट, त्याची वाइफ आहे आणि चौथी आहे माझी सर्जरी टीम मेट. सेफ राहू आम्ही मम्मा, काळजी नको करूस.” सौमील ने खुलासा केला.

खुलासा कसला! कोणाचीच नावे नाहीत. समीर -उर्मीलाची बेचैनी वाढली. ‘चेतन सारखी इथेही एखादी ख्रिस्टीना उपटलेली दिसते. चला, हाही मुलगा गेला’. मनात वाईट विचार.

‘कसलं रक्ताचं नातं अन् कसलं कौटुंबिक नातं. कसल्या गाठी आणि कसलं काय. नुसते शब्दांचे खेळ. कशातही काही अर्थच नव्हता’. समीरचे कटु विचार.

वीक एन्ड मागून वीक एन्ड, सणा सुदीच्या सुट्टया अशाच रिकाम्या जाऊ लागल्या. समीरची आणि उर्मिलाची बचैनी फारच वाढत चालली होती. समीर ऑफिसला गेल्यावर दिवसभर घरात सामसुम. घरकाम, बागकामात कितीसं मन रमवणार! दोघांचा तसा मित्र मंडळीचा, नातेवाईकांचा फारसा मोठा गोतावळाही नव्हता. कोणाकडे गप्पा मारायला जाणार अन् कोणाशी फोनवर गप्पा मारत बसणार.

समीरने ऑफिसचं बरंच काम घरून करायला सुरुवात केली. उर्मिलाचा एकटेपण काहीसा दूर झाला पण एकटेपणाची कारणं मनाला सलत होतीच.

आणि ऑफिसकडून समीरला एक ओफर आली. ओव्हरसीज डेप्यूटेशनची.

कंपनीच्या चीफ एक्जीक्यूटिव ऑफिसर कडून, मिस्टर फ्रेडरिक्स कडून कॅाल आला. ते म्हणत होते, “मिस्टर देशमूख, इंडियामधे, तिथल्या लोकल फर्म बरोबर पार्टनरशिपने आपण एक फुल फ्लेज्ड ब्रांच उघडतोय. तिथले लॉयर, फायनान्स एक्सपर्ट वगैरे त्यांचे लोकल एम्प्लॉईज असतील. त्यांच्या गुणवत्तेची

गॅरंटी त्या फर्मच्या सिनिअर पार्टनरने दिली आहे. पण त्या नव्या कंपनीत आपल्या सगळ्या कामाच्या पध्दती, नियम वगैरे रुजवायला इथला मुरलेला माणूस तिथे पोस्ट करणं जरूरीचं आहे. तुम्ही हे काम करू शकाल का?"

"किती दिवसांसाठी डेप्युटेशन असेल"? समीरने विचारले.

"पाच वर्षे, एक्सटेन्डेबल इफ रिक्वायर्ड." मिस्टर फ्रेडरिक्स म्हणाले.

"विचार करतो". असे समीर ने सांगितले. संभाषण संपले.

फोन ठेवल्यावर समीरने उर्मिलाला सर्व हकीकत सांगितली आणि मिस्टर फ्रेडरिक्सनी दिलेल्या प्रपोजल बद्दलही सांगितलं.

उर्मिला म्हणाली, "गेले कित्येक वर्षांत आपल्या दोघांचाही भारताशी फारसा संबंध राहिला नाही. आपण तिकडे जाऊ आणि मुलं इथे, इतक्या लांब. कधी काही लागलं, इमर्जन्सी आली तर कोण पहाणार? तुझे बरेच नातेवाईक आहेत म्हणा तिकडे, पण परत त्या सगळ्यांशी संबंध जुळवले पाहिजेत. शक्य होईल का आपल्याला ते?"

"बरोबर आहे," समीर म्हणाला, "आपण मुलं काय म्हणतात तेही पाहू".

रात्री आठ वाजता समीरने दोन्ही मुलांबरोबर व्हिडिओ कॉन्फरन्स कॉल लावला. सौमील लिव्हरपूलला तर चेतन तिकडे जिनिव्हा, स्वित्झरलंड मधे.

चेतन हसून म्हणाला, "हॅलो डॅड, मॉम, कसे आहात तुम्ही? इथे या नं एखादा एक्सटेंडेड वीकएंड पाहून. सगळीकडे फिरू आपण. जिनिव्हा तर सगळं पालथं घालूच आपण, पण झूरिक, यंगफ्राउ, ग्रिन्डेल्वाल्ड, इंटरलाकन, लूसर्न, डेव्हॉस, बर्न सगळीकडे फिरूया.

"ते राहू दे तूर्त चेतन. मी काय सांगतो ते ऐका जरा." समीर म्हणाला

समीरने दोघांनाही इंडियात डेप्युटेशनवर जाण्याबद्दलच्या प्रपोजलची पूर्ण कल्पना दिली. त्यांच्या स्वतःच्या त्याबद्दलच्या शंका, त्याबद्दल वाटणारी भीती मुलांच्या कानावर घातली.

चेतन म्हणाला, "ओह, डॅड! इंडिया किती लांब आहे, आणि आपल्याला कोणाला तिथे रहायला, काम करायला, इतरांकडून कामं करवून घ्यायला जमेल की नाही, काही सांगता येत नाही."

चेतनचं पाऊल स्वित्झरलंडच्या बाहेर पडेलसं वाटत नव्हतं. समीरने त्याचा नाद सोडून दिला. राहता राहिला सौमील. त्याची प्रतिक्रिया फारशी वेगळी असेल अशी आशा समीरला नव्हती. पण तेव्हढ्यात सौमीलच बोलू लागला, "डॅड धिस इज ए ग्रेट आयडिया. डॅड इंडियाला जायचं आमच्याही मनात आलं आहे."

"आमच्या म्हणजे कोणा कोणाच्या?" समीरने जरा संभ्रमानेच विचारलं.

"डॅड, माझी सर्जरी टीम मेट आहे नं, तिच्या अंकलने मुंबईजवळ सेमि अर्बन एरियामधे एक चॅरिटेबल हॉस्पिटल काढलेलं आहे." सौमील म्हणाला, "तिथे त्याना सर्जरीचा सेटअप करायचा आहे. आम्हाला विचारलं त्यांनी, मदत करू शकाल का, म्हणून. त्यामुळे आमचाही विचार चालला होता इंडियाला जायचा, पण आपल्याला जमेल की नाही याबद्दल साशंक होतो आम्ही".

समीरला काही लक्षात येईना. 'गोऱ्या मुलीचा अंकल मुंबईत कशाला हॉस्पिटल काढेल? की आपल्या समजण्यातच काही चूक झाली आहे?' तो विचार करू लागला.

"तुझी सर्जरी टीम मेट! नाव काय तिचं?" समीरने सौमीलला विचारलं.

"डॅड तिचं नाव आहे रेशमा गुप्ते. ती मूळची मुंबईजवळ पुणे नावाच्या सिटी मधली आहे, पण आता तिचे पेरेन्टस् मुंबईत सेटल झालेत." सौमीलने माहिती दिली.

ही बातमी समीर आणि उर्मिलाला अगदीच अनपेक्षित. दोघांच्याही चेहऱ्यावर हास्याच्या लकीरी उमटल्या. 'चला, काहीतरी आशा आहे'.

"डॅड, या अर्धविकसित देशांमधे मेडिकल आणि सर्जिकल सेवा फार अपूर्ण असते." सौमील बोलत होता. "आपल्या इंग्लंड सारख्या विकसित देशांमधे ज्या सोई लोकांच्या पायाशी सहजपणे पडलेल्या असतात त्यांच नखही इंडियासारख्या अर्धविकसित देशातील ग्रामिण भागातल्या लोकांना दिसत नाही. डॅड, बरेच शिक्षित लोक आणि संस्था सेवाभावाने प्रेरित होऊन अशा ठिकाणी आत खोल खोलवर जाऊन कार्य करतायत. आम्हालाही आपल्या परीने मदत करायची आहे. डॅड, आय ॲम सो ग्लॅड की रेशमाची मतं याबाबतीत माझ्या मतांशी पूर्ण जुळतायत."

"अरे पण सौमील," समीर बोलत होता. "रेशमाच्या या अंकलची काही माहिती काढलीस का तू? काही लोक फार लबाड असतात. सफेद आवरणाखाली काळे धंदे करतात."

" यू आर राईट डॅड," समीर म्हणाला, " पण रेशमाचे हे अंकल, पुण्याचे डॉक्टर रमेश प्रधान आणि डॉक्टर सुषमा प्रधान फार प्रसिध्द आहेत या क्षेत्रात. लबाडीला वाव नाही इथे".

उर्मिलाला जुनी आठवण झाली. "समीर तुझी एक आतेबहिण आहे नं पुणे सिटीमधे, डॉक्टर सुषमा प्रधान?" उर्मिला म्हणाली "फार पूर्वी आमच्या महाबळेश्वर ट्रिपला ती पुण्याहून जॉईन झाली होती."

'ही रेशमा जर सुषमाची नातेवाईक असेल तर किती विलक्षण योगायोग हा'! समीर विचार करत होता.

पुढे फारसं बोलण्या सारखं काही नव्हतं. व्हिडिओ कॉन्फरन्स कॉल संपला.

दोन दिवसांनंतर सुषमाला पुण्याला कॉल लावला गेला.

“हो, डॉक्टर रेशमा माझ्या नणंदेची मुलगी आहे. आम्ही अलीबागला नवीन केंद्र उघडतोय नं त्या संदर्भात तिच्याबरोबर आणि तिचा पार्टनर सौमील बरोबर आमचं बोलणं झालंय.” सुषमा म्हणाली.

जुन्या आणि खूप जुन्या आठवणी जागृत झाल्या. सुषमाला महाबळेश्वर ट्रीप आठवली. सगळ्यांचा लाडका झालेला छोटू सौमील आठवला. तो छोटासा सौमील आता एफ आर सी एस झाल्याचे ऐकून सुषमाला फारच कौतुक वाटलं.

समीर उर्मिलाला म्हणाला, “उर्मिला, चेतन आपल्या कामात फारच गुंतलाय आणि सध्या तरी त्याला डोकं वर काढायला वेळ नाही असं दिसतंय. पण सौमिल आणि रेशमा आहेत भक्कमपणे आपल्या बरोबर. चला तर मग, तयारी करू या, ५ वर्षांच्या डेप्युटेशनवर इंडियाला जाण्याची”

———x———

# प्रकरण ८

काळ पुढे धावत होता.

चार वर्षं लोटली होती. खूप काही घडलं होतं गेल्या चार वर्षात.

मुंबई पासून जवळ, कोकण किनार पट्टीवर अलीबाग येथे संजीवन चॅरिटेबल हॉस्पिटलची स्थापना झाली होती. अल्पावधीतच, समाजसेवेला बांधून घेतलेल्या या हॉस्पिटलचा मोठा नावलौकिक दूरदूरच्या ग्रामीण भागात झाला होता.रानावनात फिरणारे आदिवासी, वनचर भटक्या मागासलेल्या जमातीचे लोक, डोंगरकपारीला रहाणारी ठाकरं, तुटपुंज्या आमदनीवर जगणारे कोळी, मोसमी शेतीच्या कामावर जगणारे गरीब शेतमजूर या सर्वांना तर हे हॉस्पीटल म्हणजे देवाचं वरदानच वाटत होतं.

आज अलिबागला सरकारी पातळीवर मोठा समारंभ आयोजित केला होता. राज्य सरकारने अलीबागचं संजीवन हॉस्पिटल संपूर्ण राज्यामधल्या सेवावृत्तीने कार्यरत असलेल्या हॅस्पिटलस् मधे सर्वात अग्रेसर असल्याचं घोषित केलं होतं. राज्य मंत्री महोदयांच्या हस्ते या समारंभाद्वारे हॉस्पिटलचे विश्वस्त डॉक्टर रमेश व डॉ सौ सुषमा प्रधान आणि हॅस्पिटलचे संचालक द्वयी डॉक्टर सौमील देशमूख व डॉ सौ रेशमा देशमुख यांचा सन्मान करण्यात येणार होता. सरकार कडून हॉस्पिटलला गलेलठ्ठ अनुदानही जाहीर केलं जाण्याची शक्यता होती.

हॉस्पिटलच्या प्रांगणातच सुशोभित समारंभ मंडप उभारला होता. आमंत्रितांच्या आगत- स्वागतासाठी स्वयंसेवकांची लगबग चालू होती. आमंत्रितांपैकी विशेष महत्त्वाच्या पाहुण्यांना बसण्यासाठी पुढच्या तीन रांगा राखून ठेवल्या होत्या. याच रांगांमधे राखीव सीट्सवर समीर आणि उर्मिला बसले होते.

समीरच्या मांडीवर त्याचा नातू, म्हणजेच सौमिल आणि रेशमाचा दोन वर्षांचा छोटु गौरव, शांतपणे बसला होता. कुतूहलाने आजूबाजुला चाललेली लगबग, गर्दीचा कोलाहल, सगळं टिपत होता.

कार्यक्रम सुरू झाला. स्थानिक  नेत्यांची भाषणे झाली. हॉस्पिटलच्या कार्याचा आढावा घेत तेथील स्टाफच्या, डॉक्टर्सच्या कर्तव्य निष्ठेचे कौतुक केलं गेलं.  हॉस्पिटलमधल्या उपचारांमुळे दुर्धर आजारातून बऱ्या झालेल्यापैकी काही रोग्यानी त्यांची कृतज्ञता व्यक्त केली. डॉक्टरांबद्दलचा भक्तीभाव त्या मोडक्या तोडक्या भाषणात ओतप्रोत भरला होता. माणुसकीच्या बंधनाने हॉस्पिटलचा स्टाफ, डॉक्टरस्, त्या गरीब आदिवासी रोग्यांच्या कुटुंबाचा भाग बनले होते.

त्यानंतर मंत्री महोदय बोलायला उठले. हॉस्पिटलच्या समाजकार्याची, गरीब जनतेच्या आणि विशेषकरून वंचित समाजातल्या जनतेच्या, केवळ मानवतेच्या नात्याने  केलेल्या सेवेची साद्यंत माहिती त्यांच्याकडे होती. हा सर्व उल्लेख करून त्यानी हॉस्पिटलच्या विश्वस्तांबध्दल, स्टाफ बद्दल आणि विशेषत्त्वे, एखाद्या कुशल सेनापति प्रमाणे सैन्याच्या अग्रभागी राहून मानवतेच्या या सेवेत सतत व्यग्र राहिल्याबद्दल सौमील आणि रेशमाचे खूपच कौतुक केलं. हॉस्पिटलला दर वर्षी भरपूर अनुदान व अनेक सवलती सरकारकडून देण्याबद्दल सरकार वचनबध्द असल्याची घोषणाही केली.

समीर आणि उर्मिलाची छाती अभिमानाने भरून आली.  डॉक्टर्स रमेश-सुषमा प्रधान, रेशमा- समीर देशमूख याना कृतकृत्य झाल्याचे समाधान मिळाले.

समारंभ संपला.

दुसऱ्या दिवशी राज्यातल्या सर्व वर्तमान पत्रांमधे या समारंभाची हकीकत पहिल्या पानावर आली. हॉस्पिटलवर, स्टाफवर, डॉक्टर वर्गावर सर्वानी उधळलेल्या स्तुतिसुमनांचा मुक्तपणे उल्लेख करण्यात आला. फोटो छापले गेले.


कुटुंबातल्या जवळच्या, दूरच्या सर्व नातेवाईकांना सौमील आणि रेशमाचा अभिमान वाटला. ही दोघं आपल्या कुटुंबाचा भाग असल्याचे आपल्या सर्व परिचिताना सांगण्याची कुटुंबियांची चढाओढ लागली होती. अभिनंदनाच्या वर्षावाने टेलिफोन लाईन्स जाम झाल्या.


सौमील आणि रेशमाना आम्ही ओळखतो, ते आमच्या अगदी जवळच्या मित्रपरिवारातले आहेत हे सर्वांना सांगण्याची मित्रवर्गाची चढाओढ लागली होती.

सौमील बरोबरच कुटुंबातले जेष्ठ नातेवाईक समीर आणि उर्मिलाचंही कौतुक करत होते. कुणाचं कुणाशी रक्ताचं नातं आहे, की दुधाचं, की मधाचं याची कोणालाही फिकीर नव्हती. या क्षणी सौमील आणि रेशमा होते कुटुंबाचे, मित्रपरिवाराचे अनभिषिक्त राजे.


रक्ताची नाती, मैत्रीची नाती, भक्तीभावाची नाती, कौटुंबिक नाती, व्यावसायिक नाती सगळी सगळी नाती गोती मिसळून गेली होती आणि त्या सर्व रज्जूंचा भक्कम पीळ बसला होता. कुठलंही नातं त्यात उच्च नव्हतं , ना कुठलं होतं उणं. सर्व नात्यांना मिळून एकच नाव होतं, "जिव्हाळा".


———समाप्त———




श्री सुधीर कारखानीस यांची या पूर्वीची चार पुस्तके. क्लिक करताच उघडतील.



# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे सतरावे वर्ष.
# श्री सुधीर कारखानीस यांचे ईसाहित्यवर हे पाचवे पुस्तक.

श्री सुधीर कारखानीस हे एक ज्येष्ठ इंजिनियर व तंत्रज्ञ आहेत. त्यांची यापूर्वी तंत्रज्ञानावरील पुस्तके प्रकाशित झाली आहेत तसेच दोन कथासंग्रहही आहेत. त्यांच्या पुस्तकांना प्रकाशक मिळणे कठीण नाही. पण त्यांनी आर्थिक फ़ायदा मिळवण्याऐवजी आपले पुस्तक ई साहित्य तर्फ़े वाचकांना विनामूल्य देणे पसंत केले. सुधीरजींनी आपल्या आयुष्यात अनेकदा आणि बराच काळ विदेशात व त्यातही प्रगत देशांत व्यतीत केला आहे. आणि त्यांच्या कथांतून तेथील जीवन आणि भारतातले जीवन यांच्या तुलना येत असतात. या कथा स्वानुभवातून आलेल्या असल्याने त्या वास्तवाच्या जवळच्या आहेत आणि त्यातून दोन्ही जगांच्या ऋण आणि धन बाजू समजतात.

श्री सुधीर कारखानीस यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (१०), डॉ. नितीन मोरे (५२ पुस्तके), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (२), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (११), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे

वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी (५१), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (४०), आनंद देशपांडे (३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (२), अरुण कुळकर्णी (१२), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (२०), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (५), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (४), श्रीरंग कौलगी (४), यशवंत कदम (७), पांडुरंग सूर्यवंशी (३), सुधीर कारखा्नीस (५), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३), श्रीराम काळे (४), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी (३) रामकृष्ण बाक्रे(३) दिगंबर सलगर(२), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, उत्कृष्ट लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली उत्तमोत्तम पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी

रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं 'इ'यें ।
दृष्टादृष्ट विजयें